
सर्वंकष वैयक्तिक व सामाजिक कल्याणाचा राजमार्ग

नामस्मरण

डॉ. श्रीनिवास कशाळीकर



"भगवंताचे नाम ही ठिणगी आहे. ती फुलविली तर सबंध जग भरुन जाईल येवढी मोठी होऊ शकते. ज्याप्रमाणे अग्निहोत्र्याच्या कुंडामधील अग्नि थोडा धुगधुगीमध्ये असतो; त्यावर फुंकर घालून त्याचा जाळ करता येतो, त्याप्रमाणे आपण नामाची ठिणगी जागृत ठेवू. त्या ठिणगीचा जाळ करणारा उत्पन्न होईल व तो जाळ जगभर पसरेल." - श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज

नामस्मरण

सर्वंकष वैयक्तिक व सामाजिक कल्याणाचा राजमार्ग

डॉ. श्रीनिवास जनार्दन कशाळीकर

एम.डी. एफ.आय.सी.जी., एफ.एफ.एफ.बी.एम.एस. (अमेरिका)

ईशा प्रकाशन

ISSHHA

नामस्मरण

१०१, ए/२४, हॅप्पी व्हॅली,
टिकुजिनीवाडी रोड,
ठाणे (पश्चिम) - ४००६१०
मोबाईल : ९८६९३२६०८९
फोन : २५८९८९३४
ई मेल : Shriniwasijk@rediffmail.com
वेबसाईट : www.superliving.net

ई-बुक आवृत्ती :
संगणक प्रकाशन
५/६, शांती निवास, संत रामदास रोड,
गणेश टॉकीज जवळ, मुलुंड (पूर्व)
मुंबई - ४०००८१
दूरध्वनी : २५६८१६५० /२५६८८६८२
ई मेल : info@sanganak.in
वेबसाईट : www.esanganak.com

अनुक्रमणिका

ऋणनिर्देश

वास्तविक पाहता हे पुस्तक किंवा अन्य कोणत्याही कार्याचं कर्तृत्व 'माझं' नव्हे. माझ्याद्वारे ते व्यक्त झालं इतकंच.

व्यावहारिक दृष्ट्या पाहू गेल्यास पुस्तक यशस्वीपणे छापले जाण्यासाठी माझी पत्नी डॉ. सौ. विभा व मुली चि. उर्जिता व चि. मुक्ता यांना त्यांचे प्रेमळ सहकार्य व सहवास याबद्दल धन्यवाद द्यायला हवेत. त्याचप्रमाणे अप्रत्यक्ष सहकार्याबद्दल आई-वडिल, कुटुंबिय, मित्र, विद्यार्थी, सहकारी, रुग्ण, वाचक आणि विशेषतः आदरणीय अधिष्ठात्री डॉ. सौ. प्रज्ञा पै व विभागप्रमुख डॉ. सौ. श.म. केंदुरकर यांचे आभार मानले पाहिजेत.

पुस्तकाच्या प्रत्यक्ष निर्मितीचे श्रेय डॉ. व्ही.एस.भट, डॉ. गडकरी, डॉ.मूर्ती, डॉ. पुष्कर अ. शिकारखाने, सुजीत भट आणि योगेश सावे यांच्याकडे जाते.

ह्या सर्व संबंधितांचे मी मनापासून आभार मानतो आणि विश्वकल्याणाच्या प्रक्रियेतील हा 'खारीचा वाटा' जनता जनार्दनाला अर्पण करतो.

- डॉ. श्रीनिवास जनार्दन कशाळीकर

प्रास्ताविक

नामस्मरण म्हणजे देवाच्या नावाची आठवण करण्याची क्रिया. नामजपाची क्रिया. नामस्मरणाची क्रिया पुरातन काळापासून प्रचलित आहे. भगवान शंकर, वाल्मिकी, अंबरीष, प्रल्हाद, ध्रुव, आद्य शंकराचार्य, मीराबाई, चैतन्य महाप्रभु, नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, चोखामेळा, नरहरी, गोरा, गोंदवलेकर महाराज, शेगावचे गजानन महाराज, साईबाबा आणि विविध धर्मातील व अध्यात्मिक संप्रदायातील असंख्य महात्म्यांनी नामसाधना केली व तिचा उपदेश केला. महात्मा गांधी देखील नामस्मरण करीत.नामस्मरणाला जगभरातील बहुतेक अध्यात्मिक परंपरांमध्ये अत्यंत महत्वाचे स्थान आहे. परंतु आजच्या काळात तर नामस्मरणाला विशेष महत्त्व आहे, अनन्यसाधारण महत्व आहे. हे महत्व जाणून घेण्याची आज निकड आहे. कारण त्याद्वारेच मानवतेची कोसळती इमारत सावरणे शक्य आहे. **नामस्मरणाचा उपदेश देण्याची माझी इच्छा नाही.** फक्त त्याविषयीची माझी मतं वाचकांसमोर मांडायची आहेत.

नामस्मरण किंवा नामजप हे आत्मज्ञानाचे साधन आहे. पारंपारिक भाषेत बोलायचे तर नामस्मरण किंवा जप हा ईश्वराची प्रचीती घेण्याचा मार्ग आहे. ईश्वरी साक्षात्काराचा मार्ग आहे. जपमाळ घेऊन जप करणारी धार्मिक, भाविक माणसे आपण हरघडी पाहतो. नामजप वेगवेगळया प्रकारे, विविध पद्धतींनी केला जातो. तसेच जप वेगवेगळ्या वेळी, विविध प्रकारच्या जपमाळांवर व वेगवेगळ्या नामानी केला जातो. त्याचप्रमाणे जपसंख्येचे उद्दिष्टही एकच नसते. (उदा. तेरा कोटी, तेरा लाख, साडे तीन कोटी वगैरे.) आणखी एक बाब अशी, की कधी नामस्मरण ऐहिक / व्यावहारिक इच्छापूर्तीसाठी केले जाते तर कधी निष्काम भावनेने. माझ्या अल्पमतीनुसार नामस्मरण करणे हेच अत्यंत महत्वाचे आहे. तेच सर्वोच्च प्राधान्याने करणाऱ्यासाठी इतर नियम, अटी, तांत्रिकता याना तुलनेने गौण स्थान आहे.

या ठिकाणी विविध नामसांप्रदायिक परंपरा आणि त्यांचे अनुयायी यांच्याविषयी अत्यंत आदर आणि कृतज्ञत व्यक्त करुन एक बाब सर्वांच्या नजरेला आणून देणं अत्यावश्यक आहे. ती बाब म्हणजे, आजच्या काळात केलेलं नामस्मरण हे

केवळ ईश्वरप्राप्ती व आत्मज्ञान नव्हे तर भौतिक समृद्धीही साध्य करणारे आहे. नामस्मरणाचा हा सामाजिक परिणाम हाच ह्या पुस्तकाचा मुख्य व प्रातिपाद्य मुद्दा आहे. या मुद्यावर भर देण्याचं कारण असं की **नामस्मरणाचे सामाजिक परिणाम** कसे होतील याची प्रक्रिया मला समजू आणि दिसू लागली आहे. नामस्मरणाद्वारे सामाजिक कल्याण सर्वसाधारपणे अशा तऱ्हेनं घडेल.

१. आंतरिक प्रकाशाची अनुभूती येईल. या अनुभूतीचे वैशिष्ट्य म्हणजे जीवन निर्भय, निस्वार्थी आणि सहृदय बनेल.

२. उपरोक्त अनुभूती दृष्टिकोन, विचार आणि संबंधित व्यावसायिक कर्तव्यात उतरु लागेल. त्यामुळे विचार आणि कृती जगाच्या/समाजाच्या कल्याणाच्या चालल्याचे अनुभवास येईल.

३. आत्मज्ञानाचा, आत्मप्रचीतीचा म्हणजेच स्वतःच्या अमर स्वरूपाचा उत्कट आनंददायी अनुभव येईल. ह्या अनुभवाला वैयक्तिक जाणीवेच्या पातळीवरील अनुभव म्हणता येईल.

४. सर्वांची अंतर्यामे जोडणारी अखंड वास्तवता - जीवनाचेही जीवन - चैतन्याचे चैतन्य प्रत्यक्षानुभूतीस येईल. तसेच ही अखंडता व्यक्ती-व्यक्तींमधील व राष्ट्राराष्ट्रांमधील व अन्य सर्व प्रकारच्या संबंधामधील उर्ध्वगामी, विधायक व कल्याणकारी स्थित्यंतराच्या म्हणजेच उदात्त परिवर्तनाच्या रुपात प्रगट होईल. हे संबंध प्रत्यक्षात समंजस, प्रेमळ व उत्कट होत जातील.

५. वैयक्तिक दुराग्रह, संकुचित व समाजघातकी मनसुबे व कारस्थाने यांचा पराभव होऊन विशाल दृष्टी व वैश्विक कल्याणाची भावना यशस्वी होईल.

६. नामस्मरण करणाऱ्याचे अस्तित्व स्थित्यंतरित होते. जणु काही काचेच्या बल्बचे रुपांतर त्यांच्या अंतर्यामीच्या वीजेमध्ये व्हावे तसे. ह्यामुळे नामस्मरण करणाऱ्या व्यक्तीचा मुक्तिदायी प्रभाव इतरांवर पडेल, ज्याप्रमाणे एका बल्बच्या वीजेमुळे इतर बल्ब देखील पेटतात तसा. काही लोक नामस्मरणाविषयी किंवा नामजपाविषयी असा प्रतिवाद करतात,

की नामजप करणाऱ्या लाखो लोकांना कोणताही लाभ झाल्याचे आढळत नाही. मग नामस्मरणाला का महत्व द्यावे ? स्वतःच्या मुद्याला पुष्टी देण्यासाठी ते जप करीत भिक्षा मागणाऱ्यांचे उदाहरण देतात.

पुष्कळाना नामजप हा निरुपयोगी व निरर्थक चाळा वाटतो. काहीना तर नामजप हा वेडपटपणा वाटतो.

काहींच्या दृष्टीने हजारो कर्तृत्ववान, बलाढ्य वा श्रेष्ठ पुरुषांनी नामजपाचा अजिबात आधार न घेता इतिहासावर स्वतःचा ठसा उमटविलेला असतो. साहजिकच त्यांच्या मते नामस्मरणाला काहीच महत्व राहत नाही.

काहीजण अजून वेगळी भूमिका घेऊन म्हणतात की सत्याच्या प्राप्तीचे मार्ग पुष्कळ असू शकतात. फक्त नामस्मरण हाच तो मार्ग आहे असे म्हणणे योग्य नाही. ईश्वरावर श्रद्धा ठेवून वा न ठेवता सत्याची प्रचीती येऊ शकते.

ह्या प्रतिवादांचे वा शंकांचे निरसन करणारी स्पष्टीकरणे उपलब्ध आहे. पण ती आत्मज्ञानी लोकांच्या अंतःचक्षूना दिसलेल्या "दर्शनावर" व पुनर्जन्माच्या संकल्पनेवर आधारित आहेत. कर्मफलसिद्धांतावर आधारलेली आहेत. त्यांची यथार्थ जाण व्यक्तिच्या विकासावर अवलंबून असते. परंतु तरीही वरील शंकांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करायला हरकत नाही.

साधी बाब अशी की केवळ भिकाऱ्याप्रमाणे लक्तरे नेसलेली व्यक्ति सकृतदर्शनी भासते तशी लाचार व असहाय्य (भिकारी) असते असे नाही. भिकाऱ्याच्या रुपात अत्यंत **समर्थ** (अंतःसामर्थ्याने श्रीमंत) असे साधु, संन्यासी किंवा मुनी देखील असू शकतात.

सोपे नामस्मरण हे एखाद्या साध्या वीजेच्या बटणाप्रमाणे आहे. एक बटण दाबताच शेकडो बल्ब पेटून संपूर्ण वातावरणात प्रकाशाचा झगमगाट होतो त्याप्रमाणे नामस्मरणाने अंतःकरणात, मनात, बुद्धीमध्ये, चित्तात वगैरे जाणीवेच्या सर्व प्रांतात प्रकाश पडतो. नामस्मरण म्हणजे वैयक्तिक (धुसर व संकुचित) अस्तित्वातून वैश्विक प्रकाशमान अस्तित्वात जाण्याचे महाद्वार आहे. तसेच त्या अस्तित्वाचाही ते प्राणवायु आहे. जमीनीवरील माणसाला वा खोल समुद्रात शिरलेल्या पाणबुड्याला प्राणवायुचे जसे सारखेच महत्व असते तसेच सामान्य व्यक्तिला व महापंडित, महायोगी व

महर्षी ह्या सर्वांना नामस्मरणाचे महत्व सारखेच असते. त्यामुळे नामस्मरण हा चाळा वा वेडपटपणा नाही.

आपण जेव्हा अनेक श्रेष्ठ व्यक्ती नामस्मरण करीत नसल्याचे पाहतो तेव्हा त्या व्यक्तींचे मोठेपण पूर्वजन्मीच्या तपःसाधनेने प्राप्त झालेले असते हे लक्षात घ्यायला हवे. त्याचप्रमाणे सध्याच्या जन्मामध्ये नामस्मरण न करणारे बलाढ्य व मोठे लोक देखील पूर्वजन्मांमध्ये नामस्मरण करीत असू शकतात. त्याचप्रमाणे पूर्वीच्या काळी अनेक प्रकारचे साधनामार्ग प्रचलित होते. ह्या मार्गांनी विकासाचे काही टप्पे पार पडतात. आजही पूजा, ध्यान, व्रते वगैरे मार्ग प्रचलित आहेत. ह्यापैकी एक वा अनेक मार्ग देखील त्यानी सद्य वा पूर्वजन्मी अनुसरलेले असू शकतात. तसेच त्यांच्या भावी जीवनात त्यांच्याकडून नामस्मरणाचा टप्पा गाठला जाण्याची शक्यता असू शकते. त्यामुळे सध्या नामस्मरण न करणाऱ्या व्यक्ती खऱ्या अर्थाने नामस्मरणापासून वंचित आहेत असे म्हणता येत नाही.

शेवटी एक मुद्दा नीट लक्षात घ्यायला हवा. पूर्वजन्म व कर्मफलसिद्धांताचा आधार घेऊन, निव्वळ एखाद्या जातीत जन्मल्यामुळे वा अन्य कोणत्याही कारणामुळे येणाऱ्या समाजातील कोणत्याही घटकांच्या वा व्यक्तींच्या हलाखीस मी दुजोरा देत नाही. **अनुमोदन** देत नाही. **समर्थन** करीत नाही. मला असं वाटतं की हलाखीच्या परिस्थितीने खचून न जाता जन्म-पुनर्जन्माच्या व कर्मफलसिद्धान्ताच्याही पलिकडे असलेल्या स्वरूपस्थितीशी तादात्म्य पावणे आवश्यक आहे. त्यामुळेच व त्याद्वारे जन्म-मृत्यूमुळे प्राप्त होणाऱ्या अंहकारजन्य सुख दुःखाच्या **गुलामगिरीतून** मुक्ती मिळू शकेल.

त्याचप्रमाणे अशा तऱ्हेने स्वरूपस्थिती प्राप्त होण्यानेच वैश्विक कल्याण (समृद्धी व प्रगल्भता) प्रत्यक्षात येऊ शकते. ह्या विश्वकल्याणालाच मी उत्तम जीवन किंवा इंग्रजी परिभाषेत **सुपरलिव्हिंग** म्हणतो.

ह्या ठिकाणी आणखी एक मुदा लक्षात घ्यायला हवा. उपरोक्त स्पष्टीकरण वा विधाने काहींना एकदम पटणार नाहीत. **(पूर्वी मलाही पटली नसती.) परंतु ती एकदम न स्वीकारता वा एकदम फेकून न देता** जर सातत्याने नामस्मरण केले तर कालांतराने त्यांची सत्यासत्यता **निश्चितपणे पडताळून पाहून** सत्याची प्रचीती घेता येईल. कारण आपल्या बुद्धीने (अहंभावाने किंवा देहबुद्धीने) जे ज्ञान व अनुभव प्राप्त

होतात ते जाणीवेच्या तीन स्तरातून येणाऱ्या संवेदनांमुळे होतात. हे तीन स्तर किंवा ह्या तीन पातळया म्हणजे झोप, स्वप्न व जागृती. ह्या तीन पातळयातून त्रिमितींचे आणि तीन काळांचे ज्ञान शक्य असते. लांबी, रुंदी, उंची व तज्जन्य गुणवैशिष्टये आणि भूत-भविष्य-वर्तमान काळातील घटना यांचे परस्परसंबंध आपल्याला समजू शकतात. याउलट उपरोक्त स्वरुपस्थिती किंवा ईश्वर तीन काळांच्या संकल्पनेत वर्णन करता येण्यासारखा नाही. त्याचप्रमाणे स्वरूप स्थिती किंवा ईश्वर बुद्धिगम्य परिमाणांमध्येही बसत नाही. त्यामुळे ईश्वराचे वर्णन शक्य नाही आणि केवळ तर्काच्या जोरावर त्याचे आकलनही शक्य नाही. बुद्धिच्या योगानं माणूस ईश्वराच्या समीप जाऊ शकतो हे खरं आहे. परंतु बुद्धिच्या त्या 'पायऱ्यावरुन' उडी मारल्याशिवाय स्वरुपस्थितीच्या अमृतप्रवाहात तो पडत नाही. हा बुद्धीला नाकारण्याचा प्रकार नाही. बुद्धीचा सुयोग्य वापर करून तिच्या अतीत जाण्याचा प्रकार आहे. यावरून असं लक्षात येईल की स्वरूपस्थितीच्या/ ईश्वराच्या ज्ञानाचा वा प्रचीतीचा मार्ग म्हणजे नामस्मरणामध्ये स्वतःचे सर्वस्व (जे संकुचित असते) समर्पित करणे. ह्या पद्धतीनेच कालातीत, परिमाणातीत आणि जाणीवेच्या अतीत (जाणीवेच्या तिन्ही पातळयांच्या अतीत) चराचर 'जोडणाऱ्या' व 'नियंत्रित' करणाऱ्या स्वरुपस्थितीची / ईश्वराची प्रचीती येऊ शकते.

ह्या साऱ्या विवेचनावरुन वैयक्तिक व वैश्विक समृद्धी व प्रगल्भता यांचा अविष्कार नामस्मरणाशी कसा संलग्न आहे हे काही प्रमाणात तरी स्पष्ट झाले असेल.

नामस्मरण म्हणजे प्रत्यक्षात मोठ्याने वा स्मरणपूर्वक देवाचे / सत्याचे / गुरुचे 'नाव' जपणे. किंबहुना ज्या नावाच्या स्मरणाने स्वतःच्या क्षुद्र/ अपुऱ्या/ संकुचित प्रतिमेच्या पलिकडे स्वतःच्या मूळ स्थितीमध्ये स्वरूपस्थितीमध्ये जाण्यास साहाय्य होते ते नाव स्मरणे, जपणे म्हणजे नामस्मरण. अशा तऱ्हेने नामस्मरण करणे व नामात प्रतिक्षणी विरुन जाणे म्हणजेच स्वतःच्या क्षुद्र अस्तित्वाच्या प्रभावातून क्षुद्र अस्तित्वातून मुक्ती आणि स्वतःच्या खऱ्या स्वरुपाची वा सत्याची प्रचीती होय. कोणत्याही धर्माचे, संप्रदायाचे, पंथाचे, विचारसरणीचे अनुयायी असोत वा जगाच्या कोणत्याही भागातील कोणतेही लोक असोत ते जप करू शकतात. नामस्मरणामध्ये रंगून जाऊ शकतात व नामस्मरणात समरसून जाऊ शकतात. त्यांना त्यांच्या गुरूचे किंवा देवाचे नाव त्यांच्या प्रथेनुसार, परंपरेनुसार घेता येते.

ज्याप्रमाणे उगवता सूर्य स्वतःचा प्रकाश पाडण्यासाठी योजना आखीत नाही वा

अशा तऱ्हेच्या योजनेची अमंलबजावणीही करीत नाही, त्याप्रमाणे नामस्मरण ही प्रक्रिया अशी आहे की तिच्यामध्ये **साध्य, साधन व सिद्धी** सर्व सामावल्या आहेत. संपूर्णतः समरसून वा समर्पित होऊन नामस्मरण करणाऱ्या व्यक्तीच्या **जीवनाची नदी कोरडी** रहात नाही. तिच्या **पात्रातून अंतःप्रकाशाचा महापूर येतो.** अशा व्यक्तीला कुटिल कारस्थाने करावी लागत नाहीत. तथाकथित ''विश्वकल्याणाचे नियम'' लादण्यासाठी नाना प्रकारच्या **खटपटी, लटपटी, लबाड्या, कुरघोड्या** कराव्या लागत नाहीत. असल्या गोष्टी अज्ञानांधकारात भरकटणारे, स्वयंघोषित, स्वयंप्रस्थापित असे वेगवेगळया क्षेत्रात स्वतःचा नेतेपणा लादणारे बुवा, पुढारी वगैरे लोक करीत असतात.

यावरून लक्षात येईल की नामस्मरण हे 'नामस्मरणा'साठीच असते. **'स्वतः शी तद्रुप होण्यासाठी' असते.** वेगवेगळया व्यावसायिकांनी नामस्मरण केले असता त्यांच्या क्षेत्रात कल्याणकारी सामाजिक परिणाम आविष्कृत होतात. हे आविष्कार म्हणजे सूर्याच्या किरणांसारखे किंवा फुलाच्या सुगंधासारखे त्यांच्या अस्तित्वांचे परिणाम होत.

हा पुस्तक प्रपंच करण्याचे कारण म्हणजे भावी विश्वकल्याणाची गुरुकिल्ली आणि गाभा नामस्मरण आहे हे सूचित करणे. नामस्मरण हे खरोखरच अंतः प्रकाशाचे साधनही आहे आणि लक्षणही आहे. परंतु पुन्हा हे एकवार सांगायलाच हवे की ही बाब नामस्मरणानेच अधिकाधिक प्रकारच्या (उदा. नास्तिक, आस्तिक, विश्वासरहित वगैरे) लोकांच्या अंतःकरणास पटू शकते.

नामस्मरणानेच नामस्मरणामुळे येणारा वैयक्तिक अनुभव व नामस्मरणाचे वास्तव वैश्विक स्वरुप यांची प्रचीती येते. कारण नामस्मरणानेच सार व असार आणि आत्म व अनात्म यांचा बोध होतो. नामस्मरणानेच स्वतःच्या व इतरांच्या लहरी, कल्पना, छंद वगैरे शोषक वा समाजविरोधी बाबींचा स्वतःच्या मनावर पडणारा प्रभाव टाळता येतो.

ह्या पुस्तकाचं प्रयोजन अगदी खरं सांगायचं तर ह्या पुस्तकाचं एवढच की ते लिहीलं जाणं अपरिहार्य झालं. ते **मनात मावेनासं झालं.** ईश्र्वरेच्छेनेच समाजकल्याणाची तळमळ लागली. ईश्र्वरेच्छेनच नामस्मरणाच्या युगप्रवर्तक सामर्थ्याची अधिकाधिक

खात्री पटत गेली आणि त्याच्याच इच्छेनं ही अंतःप्रचीती उत्स्फूर्तपणे शब्दबद्ध झाली.

विश्वांतर्यामीचं सत्य विश्वाच्या रुपानं दृग्गोचर होत, तसं नामस्मरण करणाऱ्याच्या अंतरीची अनुभूती रोजच्या व्यवहारात दृग्गोचर होते. दृग्गोचर विश्वाचं अस्तित्व सत्यापेक्षा आणि रोजच्या व्यवहाराचं अस्तित्व व्यक्तीच्या अनुभूतीपेक्षा वेगळ्या पातळीवर असतात.

वाचकांना अशी नम्र विनंती आहे की त्यांनी ह्या पुस्तकातील मजकूरावर ‘विश्वास’ ठेवू नये. त्याऐवजी नामस्मरणाचा अभ्यास, आचरण, अनुभव यांच्याद्वारे त्यातील आशयाचा पडताळा घ्यावा. नामस्मरणाच्या संकल्पनेशी जे परिचित नाहीत त्यानी रोज त्यांच्या सोयीच्या वेळी सुमारे पाच मिनिटे नामस्मरण करुन सुरुवात करणे उपयुक्त ठरेल. ह्या काळात उदबत्ती वगैरेंच्या वापराने प्रसन्नता आणून स्थिती अंगवळणी पाडणे बरे. पण ह्या नामस्मरणाच्या पूर्वअटी नव्हेत.

एक लक्षात ठेवावं. नामस्मरण वाढत गेलं की कधी कधी मनावर ताण येतो. असा ताण पडण्याचं कारण म्हणजे सांसारिक वा इतर बाबीत गुंतलेलं आपलं मन आणि नामस्मरण ह्या दोघांमध्ये होणारी रस्सीखेच. ही रस्सीखेच क्लेशकारक असू शकते. परंतु हळु हळु वैयक्तिक संकुचित बाबींची ओढ कमी होते आणि ही रस्सीखेच व तज्जन्य त्रास नाहीसा होत जातो. यातून पुढे मनाची स्थिरता, निर्भयता, निस्पृहता, शांती आणि आनंद अनुभवता येतात. ह्या अवस्थेमध्ये विविध तत्वज्ञानांमधील एकात्मतेची आणि प्रत्यक्ष विश्वाच्या एकात्मतेची जाणीव होते. या अवस्थेमध्ये किंवा या अवस्थेतून जाताना पुढेपुढे लक्षात येते की **नामस्मरणाच्या द्वारे** भावी काळात संपूर्ण मानवजातीच्या रोजच्या जीवनातही न्याय व बंधुत्व आविष्कृत होतील.

१. नामस्मरण आणि आपले ध्येय

एखादी व्यक्ती जेव्हा तिच्या आराध्यदैवताचे 'नाम' घेऊ लागते तेव्हा यथावकाश **नामाची सर्वश्रेष्ठता व सत्ता** तिच्या ध्यानात येऊ लागते. सुरुवातीला व्यक्तीचे मन तिने निवडलेल्या बाबींमध्ये, ध्येयांमध्ये वा स्वप्नांमध्ये रंगलेले असते. हळु हळु व पुष्कळदा आत्मपरीक्षणानंतर तिच्या लक्षात येऊ लागते की तिने ठरवलेली ध्येये वा उद्दिष्टे सदोष आहेत. ध्येये कशीही असोत - 'उदात्त' वा 'संकुचित', 'दैवी' व 'आसुरी' - ही जाणीव होऊ लागतेच. स्वतःच्या बुद्धीने ठरवलेली ध्येये - मग ती संकुचित वैयक्तिक स्वार्थाची असोत वा वैश्विक कल्याणाची - ढोबळ आणि त्रुटीपूर्ण असल्याचे ध्यानी येऊ लागते. कारण अशी ध्येये नेहमीच व्यक्तिसापेक्ष असतात. त्यामुळे अशी ध्येये कधी स्वतःवर तर कधी इतरांवर जबरदस्ती / अन्याय करणारी ठरु शकतात. नामस्मरणाच्याद्वारे व्यक्ती स्वतःच्या मनोकामना, आवडी-निवडी यावर आरूढ व्हायला शिकते. ध्येयाच्या वा मनोरथांच्या दडपणावर मात करणारी व्यक्ती मनमोकळी, मुक्त व स्वस्थ होते. तणावमुक्तीचा हा अनुभव अत्यंत आनंददायी असतो. शिवाय ह्या अवस्थेमध्ये माणूस दुसऱ्याच्या नजरेतून जीवनाकडे पाहायला शिकतो व त्यामुळे सहिष्णू व समजुतदार बनू लागतो. ज्यांमध्ये इतरांनी स्वतःला झोकून दिलेलं असतं अशा ध्येयांविषयी तो उदार, सहृदय, समंजस बनू लागतो. मनाची ही अवस्था व्यक्ती-व्यक्तीमधील (हिंस्त्र स्पर्धेतून तयार होणारे) ताणतणाव, वैमनस्य व सामाजिक वितुष्टता कमी होण्यास आवश्यक व पोषक असते. मनाची ही अवस्था बेजबाबदार, असहाय, पळपुटी किंवा पळपुटेपणाची नाही हे नीट समजून घ्यायला हवे. उलट ह्या अवस्थेमध्ये ध्येयांच्या किंवा उद्दिष्टांच्यामागे होणारी फरफट थांबते आणि सारे व्यवहार खिलाडूपणे स्वस्थ मनाने व कुशलतेने व प्रभावीपणे पार पाडता येतात. ध्येयांना जर सोन्याची उपमा दिली तर ह्या अवस्थेला परीसाची उपमा देता येईल. कारण ह्या अवस्थेमध्ये जीवनातील प्रत्येक बाब सुवर्ण बनते. त्यामुळे ध्येयरुपी सोन्याचा ध्यास संपतो. जीवनातल्या प्रत्येक कार्याला उदात्त ध्येयरुपी सोन्याचे स्वरुप व मूल्यात्मकता प्राप्त होते आणि ते कार्य आत्मीयतेने, समरसतेने, प्रसन्नतेने, दडपणाविरहिततेने, सहजतेने व उदात्ततेने पार पाडण्याचे सामर्थ्य व कुवत येते.

२. नामस्मरण आणि रोजचा व्यवहार

आपल्या जीवनातील एक अतिशय महत्वाची बाब म्हणजे कामचा ताण/दडपण. एकदा आपण आपल्या नोकरीत, धंद्यात वा व्यवसायात व्यस्त झालो की त्या त्या कामाचे बरे-वाईट अनुभव आपल्याला येऊ लागतात. पुढे-पुढे ही रोजची नोकरी वा व्यवसाय जणु काही तुरुंगच बनतात. अशा व्यवसाय धंद्यात वा नोकरीत एका बाजूला रोजी-रोटीची सोय असल्याने सुरक्षितता वाटली तरी दुसऱ्या बाजूने हळु नित्याच्या नोकरी-धंद्यात मन रमेनासे होते. घुसमट होऊ लागते. जीव गुदमरु लागतो.

नामस्मरणाने आपल्या नोकरी-धंद्याला नवे परिणाम मिळते. कारण नामस्मरणामुळे नोकरी-धंदा ही केवळ रोजीरोटीची बाब रहात नाही. नोकरी धंदा हे केवळ जगण्याचे वा वैयक्तिक स्वार्थ साधण्याचे साधन नसल्याचे लक्षात येऊ लागते. ह्याचे कारण असे की नामस्मरणामुळे व्यक्तीच्या मनोधारणा आणि जीवनातील आवडी-निवडींचे व प्राधान्यांचे केंद्र बदलते. त्यामुळे स्वीकारलेल्या कामामध्ये व्यक्ती रमू लागते. ह्या रमण्यातील गुपित/गुह्य असे आहे की कामातून सुटका मिळण्याची तळमळ स्वतःला कशामुळे लागली आहे हे व्यक्तीच्या ध्यानात येऊ लागते. तिच्या लक्षात येऊ लागते की स्वतःच्या छांदिष्टपणामुळे व प्रलोभनांच्या आहारी जाण्यानेच अशी तळमळ लागते. तसेच व्यक्तीला समजून चुकते की आपल्या दिनक्रम समाजामध्ये आपल्याला काहीच महत्व मिळवून देत नाही वा आपण ह्या दिनक्रमातून समाजावर प्रभाव पाडू शकत नाही अशी आपली भावना झाली तरी देखील स्वतःच्या कामात आपले लक्ष लागेनासे होते व इतर व्यवसायांबद्दल आकर्षण वाटू लागते. नामस्मरणामुळे स्वतःच्या नोकरी -धंद्यामध्ये देखील सामाजहित साधण्याची सुप्त शक्ती आहे हे नामस्मरणाने समजू लागते. खरोखरच या आकलनामुळे स्वतःच्या व्यवसायातील प्रत्येक क्षण उत्कट आनंदाचा व समाधानाचा बनतो. समाजघातकी वा आत्मघातकी कामे आणि गुन्हे वगळल्यास उपरोक्त विधान सर्व कामधंद्यांना लागू आहे. कारण प्रत्येक व्यवसायाला वैयक्तिक अर्थार्जन, सुखप्राप्ती आणि सामाजिक सुबत्ता व समाधान असे दोन्ही पैलू असतात. फक्त बहुतेक वेळा ह्या दोन पैलूपैकी कोणताही एक किंवा दोन्हीही नजरेआड राहतात, लक्षात येत नाहीत एवढेच. याच पद्धतीने, समाजद्रोही, आत्मद्रोही वा गुन्हेगार लोकांच्या जीवनात देखील नामस्मरणाने क्रांती होऊ शकते. त्यांचे जीवन पालटून जाऊ शकते. त्यांच्याही हातून कल्याणकारी कार्य घडू शकते. वाल्याचा वाल्मिकी झाला ह्या कथेचा मतितार्थ हाच आहे.

अशा तऱ्हेच्या आकलनाने स्वतःच्या व्यवसायात खर्च केलेला प्रत्येक क्षण समाधान आणि सामर्थ्याचा महासागर बनतो.

३. नामस्मरण व असुरक्षिततेची भावना

आर्थिक, राजकीय, धार्मिक वगैरे अनेक प्रकारच्या संकटांच्या बातम्यांना आपल्याला सकाळी सामोरे जावे लागते. वैयक्तिक पेचप्रसंग, संकटे यांची उपस्थितीही चुकवतो म्हटले तरी चुकत नाही. चुकून कधी संकटे नाहीच आली तरी अडचणींची भीती काही मनातून गेलेली नसते! परिणामी आपण स्वतःच्या व मुलाबाळांच्या जीवनाविषयी व भवितव्याविषयी नेहमीच संत्रस्त आणि हवालदिल असतो. अनिश्चित असतो. असुरक्षित असतो.

नामस्मरणाने माणूस कालातीत अशा स्वतःच्या मूळ स्थितीमध्ये तद्रुप होतो. कालातीत असल्याने 'मनाची' ही अवस्था घटनांचे 'नियंत्रण' करणारे केंद्र असते. यामुळे व्यक्तीचे मन घडणाऱ्या घटनांनी प्रभावित न होता त्यांच्या कारणाशी निगडित होते. कारण घटना म्हणजे स्वरूपस्थितीचे केवळ क्षणभंगुर दृग्गोचर होणारे परिमाण वा प्रतिबिंबे आहेत हे व्यक्तीच्या ध्यानात येते. यामुळे व्यक्तीचे चित्त ह्या महाकारणाशी निगडित होऊन राहते. यामुळे व्यक्ती अगदी खरोखरच / वास्तविकपणे ढोबळ, स्थूल व परावलंबी अवस्थेतून सूक्ष्म व 'स्व' तंत्र अवस्थेत येते. व्यक्तीच्या जीवनातील हा बदल (स्थित्यंतर) सकृतदर्शनी दिसत नाही पण तो अत्यंत अस्सल, खरोखरीचा आणि अत्यंत महत्वपूर्ण असतो.

अशा तऱ्हेने वेदना व असुरक्षितिता यानी युक्त अशी मनाची खळबळ रुपांतरित होते. कारण अशी खळबळ, आणि कासावीस उत्पन्न करणारी अतिसंवेदनाशीलता व अति प्रतिक्रियाशीलता, तरल संवेदना आणि घटना नियंत्रित करणाऱ्या व इतिहास घडवणाऱ्या अचुक प्रतिसादामध्ये स्थित्यंतरित होते. आनंदाची बाब म्हणजे ही अवस्था सत्याच्या /ईश्वराच्या अत्यंत समीप किंवा सत्यरुप/ईश्वरी अवस्था असते. ईश्वरमय झालेल्या भक्ताच्या ह्या अवस्थेलाच पारंपारिक परिभाषेत सर्वशक्तिमान ईश्वराच्या चरणी राहणे असे म्हणतात.

४. नामस्मरण आणि व्यवसायाची निवड

हल्लीच्या समाजामध्ये व्यवसायनिवडीची समस्या जटिल झाली आहे. वर्णावस्था नष्ट होत गेल्याने ही परिस्थिती तयार झाली आहे. वर्णावस्था प्रचलित असताना व्यवसाय निवडीचा प्रश्नच नव्हता. व्यवसाय निवडण्याची संधी मिळवण्यासाठी देखील स्पर्धा करणे शक्य नसे. परंतु वर्णावस्था लयाला जात चालल्यामुळे व्यवसाय निवडीने व विशिष्ट व्यवसायासाठी स्पर्धा करण्याचे स्वातंत्र्य मिळू लागले आहे. यामुळे पैसा, सत्ता, किर्ती वगैरे मिळवून देणाऱ्या व्यवसायांसाठी आणि अभ्यासक्रमासाठी झुंबड उडण्याची व राक्षसी स्पर्धेची समस्या उद्‌भवली आहे. ह्या अनागोंदीचे कारण असे की आज व्यक्ती व समाजाला उपयुक्त ठरेल असा व्यवसाय निवडण्यामध्ये मार्गदर्शन करणारे सामाजिक नियम नाहीत, संकेत नाहीत. सध्याच्या व्यवसायामार्गदर्शनामध्ये आत्मज्ञानी दृष्टी नाही. **नामस्मरण व्यक्तीला वैयक्तिक हितसंबधांच्या मागे फरपटत जाण्यापासून मुक्त करते. यामुळे व्यक्तीची दृष्टी निकोप होऊन स्वतःला आणि समाजाला समाधान व समृद्धी मिळवून देणारे असे कोणत्याही कामाचे जे पैलू असतात त्यांची जाण येते.** अशा तऱ्हेने नामस्मरणाने वर्णव्यवस्थेतील जाचक तत्वे आणि अन्याय्य संकेत नष्ट करण्याचे सामर्थ्य आणि चिरंतन सत्य ग्रहण करण्याची क्षमता येते. सामाजिक उपयुक्तता व व्यक्ती स्वातंत्र्य यांचा मेळ घालण्याची दृष्टी व कुवत येते. नामस्मरणाने आत्मरुपाची / स्वरुपाची म्हणजेच सत्याची निकटता लाभते. हा सत्संग असतो. नामस्मरणामुळे तथाकथित व भंपक नेते, बुवा व गुरुंच्या मागे सर्व प्रकारची फरपट व फसगत होण्यापासून आपला बचाव होऊ शकतो. चुकीचे मार्गदर्शन करणे कुमार्गाला लावणे, मार्गभ्रष्ट करणे, फसवणे, शोषण करणे आणि पुष्कळदा अनेक प्रकारचे गंभीर गुन्हे करणाऱ्या ढोंगी बुवा-गुरुंच्या काळया कारवाया पाहता नामस्मरणाचा हा फायदा अनन्यसाधारण आहे. कारण पुष्कऴदा, व्यवसाय-मार्गदर्शनासाठी देखील आपण गुरुच्या / बुवाच्या चरणी लीन होतो.

नामस्मरणाचे हे परिमाण आणि महत्त्व काही अभ्यासक्रम व व्यवसायांसाठी चाललेली तीव्र स्पर्धा आणि अफाट गर्दी लक्षात घेतल्यास प्रकर्षाने जाणवते. ह्या अनागोंदीचा परिणाम असा की ज्यांना ह्या व्यवसायात / अभ्यासक्रमात प्रवेश मिळतो त्यातल्या पुष्कळजणांचा भ्रमनिरास होतो. पुष्कळजण निराश होतात. पुष्कळजण विटतात. ही बाब सूज्ञांच्या सहज लक्षात यायला हरकत नाही. त्याचप्रमाणे अशा तऱ्हेने व्यवसायात शिरलेल्यांमध्ये कर्तव्यतत्परता, समरसता आणि प्रामाणिकपणा कमी कमी होत जातात हेही सहज नजरेत भरते. नामस्मरणाने अशा स्वार्थी व्यवसायिकातील कोंडी व घुसमट किंवा शोषक गुन्हेगारी प्रवृत्ती टळू शकतात किंवा नाहीशा होऊ शकतात.

५. नामस्मरण व नास्तिकता

कोणत्याही धर्माचा, पंथाचा वा संप्रदायाचा माणूस नामजप/नामस्मरण करु शकतोच, पण नास्तिक देखील जप करु शकतो. जे संवेदना, अनुमान इत्यादीद्वारे ज्ञात होते तेवढेच आहे अन्य काही नाही असे म्हणणारा तो नास्तिक ह्या अर्थाने हा शब्द ह्या ठिकाणी वापरला आहे. नामस्मरणाने नास्तिकाचे देखील कल्याण होऊ शकते, त्याला आत्मज्ञान होऊ शकते अशी माझी धारणा आहे. हा फायदा कोणत्या प्रकारे होतो म्हणाल, तर त्याचं उत्तर असं की व्यक्तीसापेक्ष विचार, विवक्षित, सांस्कृतिक कडवेपणा आणि पारंपारिक रुढी यांचा व्यक्तीसापेक्ष विचार, विवक्षित, सांस्कृतिक कडवेपणा आणि पारंपारिक रुढी यांचा व्यक्तीच्या मनावरील पगडा नाहीसा होऊ लागतो. त्यांची मगरमिठी ढिली पडू लागते.

यावरुन लक्षात येईल की नामस्मरणाने व्यक्ती संकुचित वैयक्तिक जाणीवेच्या अतीत झेप घेऊ शकते. ही अत्यंत महत्वाची प्रक्रिया आहे. कारण परधर्मीय लोक, अन्य संघटनांचे सदस्य, परराष्ट्रीय, परप्रांतीय, परभाषीय अशा विविध लोकांच्या आत्मरुपाशी अखंडपणे संलग्न अशा स्वरुपाची जाणीव, खात्री व प्रचीती ह्या प्रक्रियेतून येत जाते.

तथाकथित आस्तिकांची काल्पनिक देवावरील (देवाची कृपा, कोप वगैरे) श्रद्धा आणि तथाकथित नास्तिकांची मानवाच्या मर्यादित व अपूर्ण बुद्धीच्या प्रामाण्यावरील श्रद्धा या दोन्हीहून नामस्मरण अधिक परिपूर्ण आहे. नामस्मरणाने संकुचित वैयक्तिक जीवनाचे स्थित्यंतर होऊन अवकाश, काळ व जाणीवेच्या सर्व पातळयांना प्रकाशणाऱ्या ‘जीवनाशी’ (ज्याला मी सुपरलिव्हिंग म्हणतो) व्यक्ती तादात्म्य पावते. नामस्मरणामुळे व्यक्तीला सर्वांची अंतःकरणे जोडणाऱ्या अत्त्युच्च धाग्याचा शोध लागतो व त्याच्याशी असलेल्या एकात्मतेचा अनुभव येतो.

नामस्मरणाने खरी आस्तिकता येते. अर्थात साऱ्या बदलत्या, क्षणभंगुर स्वरुपाच्या अस्तित्वापेक्षा खरेखुरे अस्तित्व सत्याला/ईश्वराला आहे याची एक हजार टक्के खात्री पटते. प्रचीती येते. त्याचप्रमाणे नामस्मरणाने खरी नास्तिकताही येते. अर्थात मर्यादित कुवतीला भासणाऱ्या दिसणाऱ्या आकलन होणाऱ्या साऱ्या बाबींवरील श्रद्धा व तज्जन फरपट नाहीशी होते.

६. नामस्मरण आणि धोरणे व योजना आखण्यामागील दृष्टीकोन

नामस्मरणामुळे व्यक्तीचे अंतःकरण सत्याच्या निकट राहतं. सर्व सामान्यतः चराचरावर सत्याची सत्ता असते असं समजलं जातं. ह्या समजाच्या मुळाशी गेल्यास तो अचुक आहे हे लक्षात येईल. या संदर्भात एक खास गोष्ट अशी की जगात बहुतेक ठिकाणी राजाला (जो राज्यकारभार करतो म्हणजेच विविध चांगल्या योजना आखतो व राबवतो) ईश्वराचा अवतार मानला जाई. पारंपारिक सूज्ञता अशी की राजाने ''ईश्वरी अवतार राहण्यासाठी'' राजधर्माच्या चौकटीत राहावं असा संकेत होता. लोककल्याणाशी बांधिलकी ठेवावी अशी अपेक्षा होती. त्याचप्रमाणे अशा तऱ्हेने राजाची वागणूक राहावी व त्याने ईश्वरी (कल्याणकारी) तत्व आविष्कृत करावे यासाठी राजगुरूची व्यवस्था होती. ह्या राजगुरुने राजाला त्याच्या 'धर्माने' त्याच्या कर्तव्यानुसार वागण्यात मार्गदर्शन करावे व राजाने राजगुरूची प्रतिष्ठा व मान राखावा अशी प्रथा होती.

आजच्या काळात ''ईश्वरी ईच्छा'' किंवा ''वैश्विक शहाणपण'' प्रगट होण्यासाठी म्हणजेच लोककल्याणासाठी नामस्मरणाची आणि त्यातून होणाऱ्या अध्यात्मिक उत्थानाची (स्पिरिच्युअल रिनसाँस) आवश्यकता आहे. आत्मज्ञान मार्गाच्या पुनरुत्थानाची पुनरुज्जीवनाची निकड आहे. सत्यशोधक धडपडीच्या पुनरुत्थानाची गरज आहे.

नामस्मरणामुळे (विशेषतः त्यातील तथ्य समजून केलेल्या नामस्मरणामुळे) सर्व सामान्य सज्जन व्यक्ती आदरणीय बनते आणि आत्मप्रचीतीने समर्थ बनते. तर सत्ताधारी व्यक्ती आत्मप्रचीतीच्या वा सत्याकलनाच्या नजीक येत नम्र व सज्जन बनते. ही बाब संतांच्या चरित्रात प्रकर्षाने आढळते. साध्या सज्जन व्यक्ती नामस्मरणाच्या सहाय्याने लोकांच्या हृदयसिंहासनाच्या सम्राटपदी पोहचल्या तर राजे महाराजे नामस्मरणाच्या सहाय्याने आत्मज्ञानी, निस्पृह व लोककल्याणकारी झाले. आजच्या काळात समजून केलेल्या नामस्मरणाने व्यक्तीला विश्वकल्याणाची मुक्तिदायी आस लागते' ते साध्य करण्यासाठी साधने गोळा करण्याची कुवत येते व ही साधने वापरुन विश्वकल्याण प्रत्यक्षात आणण्याची शक्ती येते.

अशा तऱ्हेने नामस्मरणाने सर्व शक्तिमान सत्याची प्रचीती येते. नामस्मरणामुळे

इतराना अशा प्रचीतीसाठी सहाय्यभूत ठरण्याची क्षमता येते. नामस्मरणाने आंतरिक प्रचीती स्वतःच्या क्षेत्रानुसार आविष्कृत करून प्रत्यक्ष लोककल्याण साधण्याची क्षमता येते. नामस्मरण हे नवजीवन देणारी संजीवनी आहे. **मानवजातीच्या सर्व समस्यांवरील तोडग्यांना वा उपायांना परिणूर्णत्व आणणारे हे दिव्यतम असे रामबाण औषध आहे.**

७. नामस्मरण आणि रितिरीवाज

आपल्या व्यक्तिमत्वातील वेगवेगळ्या पैलूंपैकी उदात्त पैलूंना चालना व प्रोत्साहन मिळावे यासाठी कर्मकांडांची उत्पत्ती व जोपासना होते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या प्रसंगी केल्या जाणाऱ्या विधिमंधून सामाजिक सुनियंत्रितता व सुसंवादी व्यवहार साधले जातात. काही विधि, कर्मे, संस्कार यांचा प्रभाव शारीरिक व मानसिक आरोग्यावर होतो उदा. संध्या, उपास, प्रसंगानुसार व ऋतुनुसार विशिष्ट प्रकारचे स्वयंपाक करण्याच्या रीती, लग्न, मुंज, बारसे वगैरे विधी / संस्कारांतून सामाजिक सौहार्दाची आणि विशिष्ट शिस्तीची पूर्ती होते. दिवाळी, गणेश चतुर्थी वा अन्य धर्मियांचे सण हे आंतरिक चैतन्याची अनुभूती घेण्यासाठी व मरगळ झटकण्यासाठी असतात. सर्व प्रकारचे दैन्य, खिन्नता, मनोदौर्बल्य याना पुरून टाकण्यासाठी असतात. परस्पर सामंजस्य व प्रेमाला उजाळा देण्यासाठी असतात. अहंकार टाकून ईश्वर पूजनाच्या अवीट गोडीत आणि उत्साहात रंगून सर्व तऱ्हेचे परस्पर वैमनस्य नाहीसे करण्यासाठी सण असतात. त्यासाठी विविध प्रकारच्या घटनांची विलक्षण सूज्ञ, उपयुक्त व पथदर्शक अशी योजना केलेली असते. उदा. नरकासुराचा वध, नरकासुर वध साजरा करण्याचे प्रयोजन म्हणजे अमानुषतेविषयीचा दृष्टिकोन व भूमिका पुन्हा एकदा मनात स्थापन करणे हा आहे.

सध्या संपूर्ण जगात सामाजिक विण झपाट्याने उसवत चालली आहे. सण, विधी, संस्कार यातील मर्म हरवल्यामुळे बैद्धिक, सांस्कृतिक आणि नैतिक अनागोंदी व गोंधळ माजला आहे. ह्यामुळे सर्व सणांचं, सर्व विधीचं, सर्व संस्काराचं समूळ उच्चाटन करण्यासाठी काहीजण प्राणांची बाज लावून तडफडताहेत तर दुसरीकडे जुन्या विधीचे फक्त अर्थहीन व मर्महीन मुखवटे जपण्यासाठी कीहीजण तितक्याच कडवेपणाने जीवावर उदार होऊन लढत आहेत.

सण, विधी, संस्कार वगैरे कर्मांचे मर्म आपण कोणत्याही प्रकारे आत्मसात करायलाच हवं. पण ते कसं करता येईल ? केवळ पोथी वाचनानं नव्हे, तर सततच्या व समजून केलेल्या नामस्मरणानं ऋषिमुनींची दृष्टी घेऊन अशी दृष्टी मिळाली तरच सण, विधी, व्रते, संस्कार वगैरे कर्मांमधील मर्म जपून - जोपासून त्यांचे बाह्यांगही अधिकाधिक व्यापक व समंजस बनवता येईल. नामस्मरणानं आपल्या पूर्वजांचा सर्वोच्च

वारसा असलेले भूतकालीन संस्कृतीतील जीवनामृत ग्रहण करता येते. या जीवनामृतानं व्यक्ती संकुचितपणा, धर्मवेडेपणा, कडवेपणा वगैरे ''रोगापासून'' मुक्त होते.

नामस्मरणानं कर्मकांडांची निर्दय व अमानुष अमंलबजावणी टळू शकते. कारण नामस्मरणानं जी सूक्ष्म व मर्मग्राही दृष्टी प्राप्त होते तिच्या सहाय्यानं केशवपन, पांढरी किंवा तांबडी लुगडी, सती, हुंडा वगैरे प्रथांची मूळ कारणे लक्षात येऊन त्यांना त्यांच्या तर्कसंगत शेवटाला नेता येते. कारण कोणत्याही बाबीचे मर्म कळले की त्या बाबीचे जाचक बाह्यांग सुलभतेने व अचुकपणे नष्ट करता येते.

८. नामस्मरण आणि सौंदर्य

सर्वसामान्यपणे पाहिलं तर डोळयांना, इतर ज्ञानेंद्रियांना व आत्म्याला ज्याच्यामुळे आल्हाद मिळतो त्याला सौंदर्य म्हणता येईल. सौंदर्य हे पाहणाऱ्याच्या नजरेत असतं असं म्हणतात ते खरच आहे. पण तरीही काही गोष्टी आपल्यापैकी बहुतेकाना सुंदर दिसतात हेही खरं नाही का? सुंदर डोळे हे चेहऱ्याचं आभूषण असतं. पण सुंदर डोळे म्हणजे काय? हावरटपणा, वासनाविवशता, नैराश्य, द्वेष, राग, चिंता, भीती, तिरस्कार, कुटिलपणा, फसवेपणा, उपरोध, माज, त्रासिकपणा, वैफल्य, बेपर्वाई वगैरेंनी न विटाळलेली नजर डोळयांना सुंदर बनवते. असे डोळे चेहरा सुदरं बनवतात! ज्या शब्दात सांत्वना असते, आस्था असते, समजूतदारपणा असतो, प्रोत्साहन असतं, निस्पृहता असते, ते शब्द, तो बोलणं सुंदर असतं. ज्याच्या चेहऱ्यावर स्वास्थ्य, शांती, समाधान, कृतकृत्यता, उत्साह पसरलेले असतात, तो चेहरा सुंदर असतो. थोडक्यात, लोककल्याणाची आस्था, चराचराविषयीच्या एकात्मतेची जाणीव, इतरांच्या कृतीविषयीची सहिष्णुता, आणि लोककल्याणाची कृती यांच्यामुळेच व्यक्तिमत्व संपन्न, समृद्ध, उदात्त व सुंदर बनते.

हे सारे पैलू व्यक्तीमध्ये कुठून व कसे येतात? ते येतात स्वतःच्या क्षुद्रत्वावर व्यक्तीनं काबू मिळवला की, शारीरिक, मानसिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व इतर अडचणींचे दडपण जर एखाद्याने प्रभावीपणे जिंकले तर अशा दडपणातून बिघडणारे आंतरिक व बाह्य सौंदर्य बिघडत नाही, अधिकाधिक खुलते. त्यामुळे अशा व्यक्तींचे डोळे रेखीव असोत की खोल गेलेले, त्याचा चेहरा तुकतुकीत असो की सुरकुतलेला, रंग गुलाबी गोरा असो की काळा शरीर प्रमाणबद्ध असो की बेढब, बोलणं अलंकारानी भरलेलं असो की साधं आणि त्यांचे शिष्टाचार उच्चभ्रू असोत की गावरान अशा व्यक्तींच्या सौंदर्याची परिसीमाच प्रगटते !

आपण जोपासलेला किंवा वागणुकीत आणलेला जीवनाचा प्रत्येक पैलू वरील गुणांच्या संयोगाने सुंदर, तेजस्वी आणि गोड बनतो. नामस्मरणाचा एक परिणाम असा की व्यक्तिच्या अस्तित्वाच्या गाभ्यातून अंतर्यामाचे दिव्य चैतन्य जीवनाची सारी अंगे व कृती यातून प्रगट होते.

९. नामस्मरण आणि विज्ञान

विश्वाच्या एका किंवा अधिक पैलूंचे ज्ञान मिळण्याची/मिळवण्याची एक वा अनेक प्रक्रिया ज्ञान, त्या पैलूंचे ज्ञान, त्या ज्ञानाने येणारी आंतरिक व बाह्य विश्वावर प्रभाव पाडण्याची क्षमता व यातून प्राप्त होणारा आनंद ह्या साऱ्यांचे मिळून विज्ञान तयार होते. सर्व वैज्ञानिक दृष्टिकोन व पद्धतींमध्ये एक समान बाब असते. (असावयास पाहिजे). ही सामाईक बाब म्हणजे अवैयक्तिक दृष्टी, अव्यक्तिगत निरीक्षण होय. व्यक्तिगत स्वरुपाची (स्वतःच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, वांशिक वगैरे विविध पार्श्वभूमीनुरुप बनलेली) दृष्टी असेल तर त्या व्यक्तीचे निरीक्षण, त्या निरीक्षणावर आधारलेले विश्लेषण, तसेच अनुमाने, निष्कर्ष, उपयोजिता (उदा. अणुशक्तीचा अण्वस्त्रांसाठी वापर) वगैरे साऱ्यांवर कसे दुष्परिणाम होतात हे सर्वपरिचित आहे. सूज्ञ वाचकांना ते पुन्हा पुन्हा ठासून सांगण्याची आवश्यकता नसावी !

सांस्कृतिक, धार्मिक, वैचारिक, वैयक्तिक, राष्ट्रीय, राजकीय, सामाजिक, भावनिक व अशा इतर बाबी जीवनाला सुंदर विविधता आणणाऱ्या न राहता आमच्या जीवनात प्रतिष्ठा, संकुचितपणा व कडवेपणाची कारणे बनतात. नामस्मरणाने अशा बाबींच्या अतीत जात येतं. कारण नामस्मरणानं आपलं मन अंतर्मुख होतं. स्वरुपस्थितीकडे (अस्तित्वाच्या केंद्राकडे) सुघटित होऊ लागतं. अशा प्रक्रियेमुळे आपली जाणीव उपरोक्त बाबींच्या विकृत प्रभावात अडकून पडत नाही. सूर्यकिरणांनी ज्याप्रमाणे परतपावली जाऊन सूर्यांमध्ये मिसळावं तशी ही प्रक्रिया आहे, शारीरिक, भावनिक, बौद्धिक अशा सर्व पातळयांवरील स्थित्यंतराने वैयक्तिक, संकुचित व प्रमादशील जीवनातून अवैयक्तिक, विशाल व अचुक जीवन प्रत्यक्षात येण्याच्या प्रक्रियेला नामस्मरणाने गती येते. विज्ञानाने शिक्षण, अध्यापन, योजना, संशोधन, उपयोजन आणि वैज्ञानिक शोध, व संकल्पना 'नामस्मरणामुळे' सत्याची जाणीव आणि आविष्कार यांनी भरुन जाऊ लागतात. काहीजण यालाच ईश्वरेच्छा, निसर्गाची योजना, किंवा ईश्वराची योजना प्रगट होणे असे म्हणतात. ह्या गुण वैशिष्ट्यांना सारासार विवेक वा आत्मानात्मविवेक असेही म्हणतात. या विवेकामुळेच वैज्ञानिक प्रगती आणि विज्ञानाला झालेले विश्वाचे आकलन यांची झेप व मर्यादा समजण्याची प्रगल्भता येते.

संकुचित वैयक्तिततेतून आकलन झालेले वैज्ञानिक ज्ञान हे एकात्मतेच्या विरोधात कसे जाऊ शकते हे वरील चर्चेवरुन आणि वैज्ञानिक उपलब्धीबरोबर उपयुक्ततावादी बनलेल्या

समाजाच्या सूक्ष्म निरीक्षणाने सहज लक्षात येऊ शकेल. तसेच वैयक्तिक संकुचिततेच्या पायी वैज्ञानिक शिक्षण कसे जुलमी होऊ शकते संशोधन पद्धती कशा क्रूर होऊ शकतात हे हल्लीचे विज्ञान अभ्यासक्रम व बऱ्याचदा निरर्थक व अनावश्यक वैज्ञनिक प्रयोगांमध्ये होणारे प्राण्यांचे हाल यावरुन लक्षात येईल. एवढंच कशाला, वैयक्तिक स्वार्थावर आधारल्यामुळे अध्यापन देखील किती शुष्क आणि भावनाहीन (स्वार्थप्रधान/ स्वार्थपरायण) बनू शकते आणि विज्ञानविषयक धोरणे, योजना व त्यांची अंमलबजावणी किती समाजघातकी व वंशनाश करणारी बनू शकते हे देखील अण्वस्त्रस्पर्धा, हिरोशिमा-नागासाकी वरील बॉबस्फोट किंवा युद्ध तंत्रज्ञानाचा अमानुष विकास आणि वापर यावरुन जाणवू शकेल. नामस्मरणाने विज्ञान सर्वतोपरी संपन्न, प्रगल्भ अणि कल्याणकारी बनू शकते.

१०. नामस्मरण आणि आळस

सुव्यवस्था, संरचना, सुसूत्रता, सुसंबद्धता, उर्जा वगैरे विविध पैलू विघटित वा नष्ट होत जाण्याच्या प्रक्रियेला एन्ट्रोपी म्हणतात. विश्वातील सर्व निर्जीव बाबी अशा तऱ्हेने 'एन्ट्रोपीग्रस्त' असतात परंतु जीवनाची तऱ्हा मात्र अगदी या विरोधी आहे. जीवनाचे वैशाष्टय असे की व्यवस्था, नियंत्रण, सुसंबद्धता, संरचना, संघटन, उर्जाप्राप्ती ह्यांची वाढ होते. तसेच जीवन हे जाणीवेच्या विकासाशी निगडित आहे.

परंतु पुष्कळदा आपण एन्ट्रोपीग्रस्त असतो. ती अवस्था वास्तविक पाहता जीवनचैतन्य मंदावल्याची कमी झाल्याची अवस्थाच असते. कामचुकारपणा, चालढकल, टाळाटाळ, हलगर्जीपणा अशा वैशिष्टयांनी ही स्थिती सहज ओळखता येते. चेतनाहीन अशा ह्या दशेमध्ये आपण अनास्था, बेपर्वाई, वातवरणाविषयीची उदासीनता, भित्रेपणा यांनी लडबडून गेलेले असतो. एवढच कशाला, काव्य, बौद्धिक काम, शिकणं या व अशा बाबींना आपल्याला वीट येतो.

शारीरिक दुखणी, अपुरे पोषण किंवा विकृत पोषण, प्रोत्साहनाचा अभाव, सामाजिक तुच्छता, अवहेलना, हेटाळणी अस्वीकार, वगैरे अनेक बाबींनी निष्क्रीयता येते हे खरं पण तरीही स्वतःला अवास्तव गोंजारण्याची कुरवाळण्याची वृत्ती (बॉर्डर लाईन हिस्टेरिया), निष्क्रीयतेला फारच मोठ्या प्रमाणात कारणीभूत असते. कारण असल्या स्वभावामुळे क्षुल्लक सबबी शोधून माणूस कर्तव्याकडे पाठ फिरवतो. आळस आणि फसवी वृत्ती परस्परपोषक असतात. त्यामुळे **भ्रष्टाचार, शोषण व आळस हे एकमेकाच्या आधाराने फोफावतात** ते अगदी सत्य आहे.

नामस्मरणामुळे स्वतःचे आत्यंतिक चोचले पुरविण्याची विकृती कमी होऊ लागते. कारण नामस्मरणाच्या योगानं व्यक्ती संकुचित 'स्व' च्या म्हणजेच क्षुद्र 'मी' च्या पलिकडे जाऊ लागते. यामुळे व्यक्तीमध्ये एक महत्वाचा बदल घडतो. त्या व्यक्तीसाठी स्वतःची नोकरी / व्यवसाय हे केवळ वैयक्तिक सुखाचे वा पोट भरतीचे साधन राहात नाही. त्यामुळे स्वतःच्या कामात असताना आवडी-नावडीच्या आहारी जाणे कमी होऊ लागते. आवडी-नावडी बाजूला होतानाच स्वतःच्या व्यवसायाचा सामाजिक परिस्थितीवर कसा प्रभाव पडू शकतो याची स्पष्ट जाणीव होऊ लागते. ह्या जाणीवेमुळे स्वतःच्या कार्याचे

महत्व उमजते व ते करणाऱ्या स्वतःविषयी आदर वाटतो. **हाच आत्मसन्मान होय.** ह्यानंच व्यक्ती रोजच्या कामामध्ये एक प्रकारच्या विजयी समाधानात वावरु लागते. या नव्या दृष्टीमुळे प्रोत्साहनातील गौणता जाणवून शुद्र ध्येयामागे (आमिषामागे) फरफटत जाण्याची वृत्ती बदलते. नामस्मरणाचा परिणाम असा की कामाची सुरुवात आनंदी अवस्थेत होते व सांगताही समाधानी वृत्तीमध्ये होते. परिस्थिती कितीही विपरित असली तरी नामस्मरणाच्या साह्यानं आपण तिच्यावर मात करु शकतो व स्वतःला समाधान देणारी व इतरांच्या कल्याणाला पोषक अशी सक्षमता आविष्कृत करु शकतो. नामस्मरणाच्या साह्यानं माणूस अशा तऱ्हेने समृद्ध व प्रगल्भ जीवनाकडे जातो. हे जीवन विशाल व चैतन्यपूर्ण (ईश्वरीय) असल्यामुळे मी त्याला **सुपरलिव्हिंग** म्हणतो.

११. नामस्मरण व प्रार्थना (भक्तिरचना)

विनम्र व समर्पण भावनेने ज्या शब्दरचनांच्या सहाय्याने आपण ईश्वराला आळवतो, त्या रचनांना आपण भक्तिरचना म्हणतो. संस्कृतमध्ये स्तोत्र, सूक्त, मंत्र वगैरे भक्तिरचना आहेत तर मराठीत ओवी, अभंग, भारुड, आरती वगैरे भक्तिरचना आहेत. अशा विविध प्रकारच्या भक्तिरचनांनी जगभरातील देवभक्त देवाला आळवतात.

ईश्वर प्रेमाचं व ईश्वरभक्तीचं पुनः स्मरण देणाऱ्या ह्या असंख्य प्रार्थनांच्या (भक्तिरचनांच्या) पार्श्वभूमीवर नामस्मरणाला वेगळ असं काय महत्त्व आहे ?

प्रार्थना (भक्तिरचना) आळवण्यासाठी

१. शिकण्याची सोय लागते / ही संधी पुष्कळाना मिळत नाही.

२. त्या त्या भाषेचं ज्ञान लागतं. (हे पुष्कळांना जमत नाही.)

३. बोलण्याची क्षमता लागते. (पुष्कळांना ही असत नाही.)

४. गाण्याची क्षमता लागते. (बरेच जण गाऊ शकत नाहीत)

५. मोकळा वेळ लागतो. (कामगार-मजूर-गडी वगैरेना वेळी अवेळी काबाड कष्ट करावे लागतात. त्यांना ठरवून वेळ देता येणं कठीण असतं.

यावरुन प्रार्थना, पूजा वगैरेंपासन लाखो लोक कसे व का वंचित राहू शकतात हे ध्यानात येईल. प्रत्येक धर्मामध्ये वेगवेगळया प्रार्थना/पूजा पद्धती आहेत. पुष्कळदा एका धर्माच्या पूजा-प्रकारांचा इतर धर्मीयांना उपद्रव होऊ शकतो. त्यामुळे वितुष्ट येऊ शकतं. यामुळे विरोध. दहशत वगैरेंनाही उधाण येऊ शकतं.

वास्तविक पाहता कोणत्याही धर्माच्या प्रार्थनेचा हेतू हा ईश्वर/सत्याचा साक्षात्कार व कुटुंबात आणि व्यवसाय क्षेत्रात त्याचा आविष्कार हा असतो. परंतु तांत्रिक कर्मकांडांमुळे अनेक प्रार्थनापद्धती / पूजापद्धती त्यांच्या बाह्यस्वरुपाच्या अनुषंगाने रोजच्या कौटुंबिक व व्यावसायिक बाबींपासून तुटल्या आहेत. त्यामुळे पुष्कळदा प्रार्थना व समाजविरोधी कारवाया एकत्र नांदतात सामान्य माणूस पुष्कळदा विवक्षित पूजा-प्रार्थनांचे स्तोम माजवणाऱ्या स्वार्थांधांकडून पिळला जातो. नागवला जातो. असल्या

प्रकारचे ''प्रार्थनावेडे'' स्वार्थांध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व अगदी वैज्ञानिक क्षेत्रात देखील पाय रोवून असतात. कळत-नकळत एकीकडे प्रार्थना तर दुसरीकडे लोकांची लूटमार करीत असतात.

प्रार्थना, पूजा वगैरेंच्या बाह्यांगांमध्ये फसवेपणा, अंधश्रद्धा, ढोंगबाजी, परावलंबीत्व, आळस, भेदभाव, वितुष्ट, द्वेष वगैरेंना खतपाणी घालण्याची सुप्त क्षमता असते.

नामस्मरणामध्ये प्रार्थनेचे सर्व गुण आहेत. शिवाय कोणत्याही धर्मांची कोणतीही पार्श्र्वभूमी असलेली, शिक्षणाला मुकलेली, तांत्रिक कुशलता नसलेली, कोणतीही साधनसामग्री नसलेली व्यक्तीही नामस्मरण करु शकते. कोणत्याही वेळी, कोणत्याही ठिकाणी बिनबोभाटपणे इतरांना यत्किचितंही त्रास न देता नामस्मरण करता येतं नामस्मरणासाठी रोजच्या कामातून फावला वेळ व सोवळ ओवळे वगैरे काहीही लागत नाही.

पूजा, स्तोत्रे, मंत्र, प्रार्थना वगैरे बाबी वेगवेगळया धर्मांची अतूट अंगे आहेत. त्यांना त्यांचे स्वतःचे महत्त्व आहे. वैशिष्टय आहे. त्यांचे कार्य व प्रभाव अनन्यसाधारण आहे. त्यांना कमी लेखणे, त्यांची अवहेलना करणे अत्यंत गैर आहे. त्यांना विरोध करणे साफ चूक आहे, कारण असा विरोध संकुचित 'स्व' मधून उत्पन्न होणाऱ्या घमेंडीतून जन्म घेत असतो. परंतु आजच्या गुंतागुंतीच्या, गोंधळाच्या आणि ताणताणावाच्या परिस्थितीत एकंदर भर इतर बाबीच्या ऐवजी नामस्मरणावर देणे अत्यावश्यक आहे. तेच सर्वांच्या हिताचे ठरेल. स्तोत्रे, प्रार्थना, पूजा वगैरेंच्या द्वारे माणसाचा संकुचित 'स्व' ईश्र्वरासमोर म्हणजेच त्याच्या विशाल 'स्व' समोर लीन होणे चालू राहीलच. त्याचप्रमाणे वेगवेगळया धर्मांमध्ये भजन, पूजन, अर्चन वगैरे सारे काही वेगवेगळया स्वरुपात त्या त्या धर्मांतर्गत बंधुभाव जोपासत राहतील. तसेच वैविध्यपूर्ण पारंपारिक स्वरुपात त्या त्या धर्माच्या अनुयायांना ईश्र्वराचे स्मरण देत राहतील. पंरतु नामस्मरण हा साऱ्या धर्मपंथांचा आणि पूजापाठांचा चैतन्यमय गाभा असून हा गाभा सर्व पंथोपपंथांना आणि प्रार्थनादिकांना विश्र्वात्मकतेच्या उज्वल प्रकाशाने पुनीत करतो. त्यांना नवजीवन देतो.

१२. नामस्मरण आणि शिक्षण

शिक्षण ही स्वतःचे खरे स्वरुप समजण्याची अनुभवण्याची आणि प्रगट करण्याची प्रक्रिया आहे. शिक्षण म्हणजे क्षुद्रत्वाचे प्रगल्भतेत होणारे स्थित्यंतर. स्वतःच्या सुप्त आंतरिक क्षमतेचा आविष्कार करण्याचे स्वातंत्र्य मिळवणे हाही शिक्षणाचा एक अर्थ आहे. शारीरिक, मानसिक, बौद्धिक, तांत्रिक, कलात्मक, वैज्ञानिक, सांस्कृतिक अशा अनेक प्रकारचे अध्यापन व अध्ययन शिक्षणामध्ये अंतर्भूत आहेत. अशा अध्ययन अध्यापनाचा हेतू, विद्यार्थ्याला आणि अध्यापकाला स्वतःची क्षमता, मनाचा कल, त्यानुसार ठरणारे स्वतःचे क्षेत्र आत्मज्ञानाच्या प्रकाशात नीट समजावे व आविष्कृत करता यावे हा असतो.

एखाद्याला जर अविचारीपणापायी वा मनमानीनुसार काही तांत्रिक, वैज्ञानिक वा इतर कुशलता वा माहिती मिळाली तर त्यातून हट्टी, संकुचित आणि कधी कधी समाजद्रोही असा "तज्ज्ञ" तयार होऊ शकतो. असे "मोठे" निष्णात लोक स्वतःला व समाजाला लाभाऐवजी हानिच पोचवतात. याउलट काही विद्यार्थी सज्जन असणे तरी बौद्धिक वा इतर गुणवत्ता नसल्याने त्यांच्यावर ज्ञान किंवा तंत्रकुशलता लादणे हे देखील सर्वदृष्टया उपद्रवकारक ठरते.

लहानपणापासून स्वतःला आणि इतरांना आत्मीयतेने नामस्मरणाची गोडी लावली तर आंतरिक प्रकाश व शक्तीचे दालन खुले होते. त्याचप्रमाणे दृष्टीही विशाल होते. स्वतःचे समाधान व समाजाचे कल्याण याबद्दल जाण येऊ लागते. त्यामुळे शिक्षणाचे केंद्र नामस्मरण ठेवले आणि त्याला इतर ज्ञान व कुशलतेच्या अध्यापन-अध्ययनाची जोड दिली तर शिक्षक, विद्यार्थी व समाजाचे खऱ्या अर्थाने सर्वंकष कल्याण होऊ शकेल.

पूर्वीच्या काळी शिक्षणाचे केंद्र ईश्वर होते. ईश्वरसाक्षात्कार हा गुरुकुल पद्धतीचा आत्मा होता. देवळाची रचना, वास्तुकला, आणि तिथल्या समारंभातून व उत्सवांतून जीवन, विज्ञान, तंत्रज्ञान कला प्रक्षेपित होत होती. मंदिरे व अशा तऱ्हेची पुजास्थाने यांचा विकास व प्रतिष्ठा ही सत्याच्या साक्षात्काराच्या शोधाची प्रतीकेच होती. ही बाब विशेषतः दक्षिणेतील काही हिंदू मंदिरांमध्ये प्रकर्षाने आढळते.

पूजास्थानांचा परिसर व तिथल्या उत्सव समारंभातून शिक्षणाचा हा गाभा आज

हद्दपार झाला आहे. जीवन गुंतागुंतीचं झाल्यामुळे आणि शिक्षणांशी संबंधित असलेल्यांना शिक्षणाचा गाभा न कळल्यामुळे हे झालेलं आहे. त्यामुळे पूजा स्थानांच्या भव्य वास्तू व धर्मपंथ, शिक्षणाची साम्राज्ये, उद्योधंद्याच्या प्रचंड वसाहती आणि राजकीय सत्तेची केंद्रे सत्याच्या शोधाच्या अभावी आज विसंवाद, वितुष्ट आणि विनाशाच्या दरीत कोसळत आहेत.

नामस्मरणाच्या साहाय्यानं आज हरवलेलं शिक्षणाचं खरं वैभव, शिक्षणाचा आत्मा पुन्हा आत्मसात करता येईल. नामस्मरण आचरणात आणले गेल्यास प्रार्थना, वैयक्तिक व सामाजिक कल्याणाचे प्रकल्प, सर्जनशीलता, उत्पादकता वगैरे बाबी प्रत्येक संस्थेच्या अविभक्त बाबी बनतील. यामुळे पुजास्थानांना नवचैतन्य प्राप्त होईल आणि शिक्षणसंस्थांना पावित्र्य येईल. तसेच व्यापार उदीम, उद्योग धंदे, राजकीय सत्ता अशा अनेक क्षेत्रांची स्थानेही उदात्तता, प्रामाणिकपणा, निस्वार्थीपणा, उदारपणा यांनी भरुन जातील.

नामस्मरणानं जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात चैतन्याभिसरण होऊ लागेल व त्यामुळे रक्ताअभावी सडणाऱ्या शरीराच्या भागांप्रमाणे मरत चाललेल्या समाज पुरुषाच्या साऱ्या अंगांमध्ये सुसंवाद, एकात्मता आणि सुनियंत्रितता येऊ लागेल.

नामस्मरणामुळे ढोंग, दिखाऊपणा, विघटन, परात्मभाग (तुटलेपणा) यांचे जीवनाच्या सर्व क्षेत्रातून (व त्यामुळे शिक्षणक्षेत्रातून) उच्चाटन होऊन शिक्षण जीवनाशी आणि जीवन सत्याच्या म्हणजेच ईश्वराच्या साक्षात्काराशी अतूटपणे एकनिष्ठ राहतील.

१३. नामस्मरण आणि संमोहनशास्त्र

नामस्मरणाचे सार आणि नामस्मरणाचा परिणाम म्हणजे वाढती निस्पृहता. पण निस्पृहता म्हणजे काय ? व ती ओळखायची कशी ? तर ह्या निस्पृहतेचे वैशिष्टय म्हणजे नुकसान आणि अपेक्षाभंगामध्ये देखील अविचल आणि स्वस्थ राहण्याची क्षमता. एका परीनं ह्याचा मतितार्थ म्हणजे इतरांकडून कमी अपेक्षा ठेवून इतरांना स्वतःचे देण्याची वाढती तयारी ठेवणं. हे असं घडण्याचं कारण म्हणजे नामस्मरणामध्ये वैयक्तिक संकुचित सुख देणारे काहीही नाही. नामस्मरणात सुवास, चव, कर्ममधुरता, सौंदर्य, रंग असं काहीच नसतं. थोडक्यात इंद्रियांची तुष्टी वा पुष्टी नामस्मरणानं होत नाही. नामस्मरणामध्ये बौद्धिक करामत नसते. त्यामुळे नामस्मरणाने बौद्धिक भूक शांत होत नाही. नाम म्हणजे कविता नव्हे. त्यामुळे लौकिकार्थाने आपण ज्याला भावनिक ओलावा, सांत्वन किंवा उब म्हणतो ती नामस्मरणाने मिळत नाही. नामस्मरण म्हणजे सादर केलेला कलाविष्कार नव्हे. त्यामुळे नामस्मरणामुळे प्रशंसा, कौतुक, उत्तेजन, किंवा वाहव्वा मिळत नाही. नामस्मरण म्हणजे व्यापार उदीम, व्यवसाय नव्हे. त्यामुळे नामस्मरण हे धनप्राप्तीचे साधनही नाही. साहजिकच कोणताही वैयक्तिक / संकुचित स्वार्थ साध्य न करणारी गोष्ट (नामस्मरण) आवर्जून व सतत करणारा माणूस निस्वार्थी होत जाणं हे क्रमप्राप्तच नाही का ? अर्थात नामधारकाच्या हृदयात वैयक्तिक नाही तर सर्वांच्या सर्वकष कल्याणाचा झरा स्फुरतो.

संमोहन उपचार तज्ञ, संमोहनतज्ञ किंवा स्वसंमोहन करणारे लोक काही विशिष्ट हेतू किंवा आशेच्या आहारी जाऊन संमोहनचा वापर करतात. हे असं करणं म्हणजे क्षुद्र/संकुचित स्वार्थाच्या आहारी जाणं असतं, त्यावरील विजय नसतो. संमोहन किंवा स्वसंमोहनाचा उद्देश आंतरिक स्वतंत्र्याचा नसतो आणि संमोहन तंत्रामध्ये तशी कुवतही नसते. संमोहन तंत्र आपल्याला संकुचित दृष्टिकोन आणि कोती वृत्ती यातून मुक्त करु शकत नाही. उलट संमोहनाच्या तंत्रानं 'तर्कशुद्ध' वा 'तर्कदुष्ट' अशा मोहजाळात माणूस अडकत जातो.

परंतु संमोहनतंत्र नामस्मरण करीत योग्य प्रकारे वापरले तर तात्पुरत्या वैयक्तिक लाभासाठी किंवा व्याधी / वेदना मुक्तीसाठी मात्र उपयुक्त साधन आहे.

याउलट नामस्मरण हे व्यक्ति आणि विश्वाला सर्वोच्च स्वास्थ्य, आनंद आणि कल्याण देणारे दिव्यौषधी आहे.

१४. नामस्मरण आणि धर्मग्रंथ

धर्मग्रंथांना मानवी जीवनात अनन्यसाधारण स्थान आहे. धर्मग्रथांमध्ये सामान्यतः विश्वाची उत्पत्ती, मनुष्याची उत्पत्ती, मनुष्य व प्राण्यांचे नाते, मनुष्य आणि ईश्वर यांच्यातील संबंध वगैरेंचे विवरण असते. धर्मग्रंथांमध्ये वर्षानुवर्षे साठत आलेली मानवी निरीक्षणे, भावना, संकल्पना, कल्पना, अंदाज आणि कधी कधी आचारसंहिताही असते. धर्मग्रंथ, पोथ्या, व तत्सम साहित्ये पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ बनतात. थोडक्यात समाजाला उपयुक्त असे शहाणपण धर्मग्रंथात असते.

परंतु विविध धर्म ग्रंथांतून वेगवेगळे ऐतिहासिक कालखंड प्रतिबिंबित होत असतात. त्यामुळे वेगवेगळया सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचे वैविध्यपूर्ण चित्र धर्मग्रंथांमध्ये उमटलेले आढळते. परिणामी वेगवेगळया व प्रसंगी परस्परविरुद्ध संकल्पना, सिद्धान्त व विधाने देखील धर्मग्रंथांत असतात. यामुळे धर्मग्रंथांचे परिशीलन आणि आकलन अधिकाधिक क्लिष्ट बनत जाते. अर्थात भाषेमध्ये पडणारा फरक, नवीन काही घुसडले जाणे, काही भाग गाळणे, संबंधित असे इतर ग्रंथ गहाळ होणे किंवा नष्ट होणे, सामाजिक परिस्थितीत बदल घडणे यामुळे देखील धर्मग्रंथांच्या यथार्थ आकलनात अडचण येते. त्यामुळे धर्मग्रंथांचा स्वीकार करायचा की त्याग करायचा हा यक्ष प्रश्न जगातील सर्व समाजांना पडतो. त्याचप्रमाणे जर धर्मग्रंथ स्वीकारायचे तर किती प्रमाणात व कोणत्या निकषावर ही कूट समस्या देखील तयार होते.

धर्मग्रंथांचे सार आत्मसात होण्यासाठी आणि त्यांचा जीवनात यथायोग्य आविष्कार होण्यासाठी निस्पृहता, निःपक्षपातीपणा आणि विशाल व अवैयक्तिक दृष्टी आवश्यक आहेत. याशिवाय कष्टाळूपणा व बुद्धीची गरज असतेच.

धर्मग्रंथांचं सतत, वाचन, परिशीलन, चिंतन होऊन **त्यांच्यातील उपयुक्त सारतत्वाचे** रक्षण, संवर्धन, जोपासना आणि जीवनाच्या विविध क्षेत्रात त्याची अंमलबजावणी होणे आज निकडीचे आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवं.

ज्यांना धर्मग्रंथाचे अध्ययन करायचे आहे त्यानाच नव्हे तर इतरांनाही धर्मग्रंथांच बोधामृत उपलब्ध होऊ शकतं. त्यासाठी ते खरोखर निस्वार्थी व्हायला हवेत. या अगोदर पहिल्याप्रमाणे असा निस्वार्थपणा नामस्मरणाने येतो. संत. ऋषी, मुनी, दार्शनिक वगैरेंच्या जीवनातून या बाबीचा आपल्याला प्रत्यय येतो. विद्वान मंडळी नामस्मरणाच्या

सहाय्याने धर्मग्रथांचे सार समजून घेऊन सुयोग्य भाषेत मांडू शकतात तर इतरजण त्यांचा अनुभव शब्दात मांडू शकले नाही तरी धर्मग्रंथांच्या साराचा दिव्यानुभव आनंदानं जीवनात प्रत्यक्ष प्रगट करु शकतात. ही बाब व्यक्ती व समाजाच्या व व्यक्तीच्या कल्याणाची आहे. थोडक्यात, नामस्मरणामुळे पूर्वजांचे- शहाणपण, सध्याच्या गरजा आणि भविष्यकाळातील मानवजातीचे उत्थान यातील (उपयुक्त) संवाद प्रक्रिया सुरु होते.

१५. नामस्मरण व सद्‌गुण

सद्‌गुण म्हणजे दृष्टी, ग्रहणशीलता, विचार, वागणूक या सर्व प्रकारे वैयक्तिक व सामाजिक कल्याण साधणारे प्रत्येक वैशिष्टय. सद्‌गुणानी मनुष्य आणि समाज अध्यात्मिक आणि भौतिक अशा दोन्ही दृष्टया संपन्न आणि प्रगल्भ होतात. सद्‌गुण वैयक्तिक आणि सामाजिक अशा दोन्ही स्तरांवरील असतात. तसेच शारीरिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा प्रत्येक कृतीशी संबंधित असेही सद्‌गुण असतात. उदाहरणार्थ स्वच्छता, नियमित व्यायाम हे शारीरिक (हिताचे) सद्‌गुण आहेत. प्राणायाम, पुजा वगैरे चांगले गुण मानसिक व अध्यात्मिक हिताचे आहेत. वक्तशीरपणा, विश्र्वासार्हता, प्रामाणिकपणा ह्या सद्‌गुणांना सामाजिक परिमाण आहे. ह्या सर्व "सद्‌गुणांना" कालसापेक्षता व परिस्थितीसापेक्षता व समाजसापेक्षता असते.

वेगवेगळया समाजातील संकेत, नियम, शिष्टाचार, परंपरा वैयक्तिक आणि सामाजिक जाणीवेच्या पातळीनुसार उदयाला येतात. जगातील वैशिष्टयपूर्ण कायदेपद्धती आणि राज्यघटना देखील याला अपवाद नाहीत. परंतु सद्‌गुणांचे स्वरुप तयार करणे व मांडणे कालखंड, भौगोलिक परिस्थितीच्या वैविध्यामुळे बदलत जाते. यामुळे एखाद्या बाबींची संवेदना, आकलन, विचार व प्रतिक्रिया या सर्व बाबतीत जगात विविधता आढळते. यामुळे समूहांमध्ये प्रांत, भाषा, धर्म राष्ट्र वगैरे अनेक प्रकारची वैशिष्टये तयार होतात. किंबहुना प्रत्येक वैशिष्टय "अहम" बनते ! साहजिक अशा स्थितीत सद्‌गुणांच्या स्वरुपाविषयी जी विशिष्ट संकल्पना बनते, जी व्हॅल्यू जजमेंट बनते ती पूर्वग्रहदूषित व अयोग्य बनते.

ह्या मनःस्थितीतून जगातील वेगवेगळया समाजांमध्ये त्यांच्या त्यांच्या सद्‌गुणसंकल्पना व तज्जन्य वैशिष्टयांबद्दल गर्व, स्वतःला अधिकाधिक स्वातंत्र्य घेऊन इतरांना स्वतःच्या मनाने वागवण्याची वृत्ती, तसेच स्वतःहून वेगळया वा भिन्न असलेल्या समुदायांबद्दल द्वेष, दहशत अशा गोष्टी शिरतात आणि कलह व लढायांना सुरुवात होते.

दरम्यान सद्‌गुणाच्या नावाखाली जे तयार होतं ते विनाशाला कारणीभूत होऊ लागतं ! सद्‌गुण आणि दुर्गुण यात फरक करणं अत्यंत अवघड झालं आहे. कारण धर्मग्रंथ, पोथ्या, पुराणे, शास्त्रे वगैरे देखील आजच्या काळात अचुक मार्गदर्शनासाठी

उपयोगी पडत नाहीत. कारण सामाजिक संबंध पार बदलले आहेत व झपाट्याने बदलत आहेत. जाहिराती मॉडेलिंग, संगणक, इंद्रिय प्रत्यारोपण, गुणसूत्रीय तंत्रज्ञान वगैरेंसारख्या सामाजिक वैज्ञानिक बदलांमुळे नवीन नैतिक प्रश्न, नव्या सांस्कृतिक समस्या तयार होत आहेत. आचारसंहितेविषयी, मूल्यांविषयी आणि थोडक्यात सद्‌गुण/दुर्गुणाविषयी प्रचंड संभ्रम तयार होत आहे.

त्यामुळे वेगवेगळया काळातील, वेगवेगळया लोकसमूहांच्या विविध आचारसंहिता, नैतिकता, सद्‌गुण कल्पना यांना जोडणारे ह्या सर्वांचे सार शोधून काढण्याचे आव्हान आज आपण सर्वांसमोर आहे.

एका परिस्थितीत पहाटे पाच वाजता उठून पूजा करणे हा सद्‌गुण (सत्कृत्य) असू शकतो तर वेगळया परिस्थितींमध्ये यंत्रावर काम करणे किंवा प्रसूति-शस्त्रक्रिया करुन स्त्रीची सुटका करणे हे सद्‌गुण (सत्कृत्ये) असतात. शाकाहार ही सन्मानजनक बाब असू शकते पण एखाद्या परिस्थितीत. अन्य परिस्थितीत कच्चा मासा खाणं अपरिहार्य (म्हणूनच निन्दा न करण्यासारखं) असतं. एखाद्या समाजात मद्यपान ही तिरस्कृत बाब असते, तर इतर अनेक समाजात मद्यपान हा रोजचा रिवाज असतो. त्याचप्रमाणे पतिमृत्यूनंतर दीराशी विवाह करणे ही 'नियोग' नावाची पद्धत एका काळात (महाभारतकाळ) सर्वमान्य असते तर अन्य काळी ती कल्पनेमध्येही बसत नाही. तसेच देवासमोर पशुंचा बळी देणे एका काळी संस्कृतीचा मानदंड असू शकते तर अन्य काळी तीच बाब घृणास्पद ठरु शकते.

नामस्मरणाने वैयक्तिक आणि सामुहिक जाणीव ऐतिहासिक आणि भौगोलिक संकल्पनांच्या व वैशिष्टयांच्या अतीत जाते. नामस्मरणामुळे जाणीव, प्रांतिक, भाषिक, राष्ट्रीय, सांस्कृतिक आणि भेदांच्या अतीत जाते. नामस्मरणामुळे भूतकाळ, भविष्यकाळ व वर्तमानकाळातील सद्‌गुणांचे मूलतत्व आणि जगातील वेगवेगळया समूहांच्या सद्‌गुणांचे मूलतत्व आपल्या हृदयात एकजीव होतात. ह्या महाप्रक्रियेमध्ये तीन प्रक्रिया अंतर्भूत असतात.

१. सर्वांना सर्वकाळी जोडणाऱ्या मूलतत्वाबद्दल आत्मीयता व आदर वाटतो.

२. इतरांच्या धर्म-पंथातील त्यांच्या त्यांच्या धर्माचे गौरविलेल्या सद्‌गुणांच्या/ सत्कृत्यांच्या बाह्यांगांबद्दल सहिष्णुता व लवचिकता वाढते.

३. वैश्विक एकात्मतेच्या दिशेने, विविध धर्मांकडून सद्‌गुण / सत्कर्मांच्या बाह्यांगांत योग्य ते बदल करण्याची सुरुवात होते.

१६. नामस्मरण आणि गुलामगिरी

आपल्या प्रत्येकाच्या जीवनात एक मोठाच कूट प्रश्न आहे, तो म्हणजे खऱ्या स्वातंत्र्याची प्राप्ती. कोणत्याही कारणामुळे व कोणत्याही हेतू-ध्येय-व्यक्तीसाठी अवाजवी, तर्कदुष्ट व इच्छेविरुद्ध स्वतःला वाहून घेणे म्हणजे गुलामगिरी पत्करणे असे म्हणता येईल. याउलट इतरांच्या गरजा, त्यांच्या आकांक्षा यांना डावलून त्यांच्यावर विशिष्ट मानसिक व भौतिक परिस्थिती लादणे म्हणजे दुसऱ्यावर गुलामगिरी थोपणे असे म्हणता येईल. गुलामगिरी (पत्करणे / लादणे) ही बाब जगामध्ये अनेक रुपात आविष्कृत झाली आहे. गुलामांचा व्यापार, गुलामांचा छळ, बेठबिगारांची हलाखी, अस्पृश्यांचे हाल, स्त्रियांचे शोषण वगैरे सारी गुलामगिरी पत्करण्याची आणि लादण्याची उदाहरणे आहेत.

अनेक विचारसरण्यांमधून वेगवेगळया स्वरुपातील गुलामगिरी विरोधी सूर उमटलेला आहे. वेगवेगळया सामाजिक, राजकीय आणि अध्यात्मिक चळवळीद्वारे देखील गुलामगिरी विरोधी संघर्ष होत आला आहे. परंतु तरीही गुलामगिरी लादणे व पत्करणे चालूच आहे. तथाकथित आधुनिक अशा आपल्या समाजात राजकीय, धार्मिक व इतर संघटना आणि आर्थिक, शैक्षणिक व इतर संस्थांमध्ये हे सर्रास आढळते. म्हणजेच गुलामगिरीवरील मात प्रत्यक्षात न येता मानवाला हुलकावण्यात देत आहे. आहे उपाय याच्यावर ?

होय. यावर उपाय म्हणजे ईश्वरनामाची गुलामी, कदाचित हे उत्तर विचित्र वाटेल. परंतु रुढार्थाने अस्तित्वाच्या अतीत असलेल्या नामाच्या अधीन होऊ पाहणारा माणूस रुढार्थाने जे 'नाही' त्याचा गुलाम बनतो! म्हणजेच तो मानवी आकलनशक्तीतील विश्वाच्या (पगड्यांतून) गुलामीतून मुक्त होतो. अशा तऱ्हेने मानवी विचार, भावना व वासना यांच्या सत्तेतून मुक्त होणे म्हणजेच स्वातंत्र्य होय. प्रापंचिक, भौतिक विश्वात 'स्वातंत्र्य' येण्यासाठी तसेच बेबंद भोगवाद, संकुचित व धूर्त उपयुक्ततावाद, बेजबाबदार मनमानीपणा, राक्षसी महत्वाकांक्षा यांचे विनाशकारी थैमान टाळण्यासाठी ही पूर्व अट आहे.

गुलामगिरी लादणारे व पत्करणारे सारेजण वास्तविक पाहता काही विवक्षित विचारांचे, जाणीवांचे व वासनांचे गुलाम असतात. नामस्मरणामुळे ह्या बेड्या तुटून पडतात आणि नामाशी तद्रुपता येते. नामाधीन होणारा माणूस इतर कुणाचाही वा कशाचाही मिंधा होण्याची शक्यता नष्ट होते. नामस्मरणाचा स्वीकार, अभ्यास व प्रचार गुलामगिरीचे सर्व क्षेत्रातून उच्चाटन करण्यासाठी किती महत्वाचा आहे हे यावरुन लक्षात येऊ शकेल. **''नामाची गुलामी'' जीवनातील सर्व क्षेत्र स्वातंत्र्य व सुसंवादाच्या चैतन्याने भरुन टाकू शकते.**

१७. नामस्मरण व बालसंगोपन

बालकाच्या भवितव्याची पालकांना साहजिकच काळजी असते. त्यामुळे बालसंगोपन ही आजच्या पालकांसमोरील अत्यंत महत्वाची व जटील समस्या आणि कर्मकठीण असे आव्हान आहे.

मुलांना खेळणी कोणती द्यावी इथपासून ते खायला प्यायला काय द्यावं इथपर्यंत आणि कोणते कपडे द्यावे इथपासून ते टॉनिक कोणती द्यावी इथंपर्यंत अनेक प्रश्न पालकांच्या मनात गर्दी करत असतात. कोणती प्रार्थना, कोणती भाषा, कोणत्या सवयी, कोणती शिस्त, कोणते संस्कार मुलांना चांगले ठरतील हे प्रश्न पालकांना भंडावत असतात. एवढच नव्हे तर कोणता व्यायाम, कोणते शिष्टाचार, कोणते आचार मुलांकडून अपेक्षित असावे याबद्दलही गोंधळ असतो. ह्याला कारण म्हणजे परस्परविरोधी मतमतांतरे मांडणारे, वेगवेगळा प्रभाव पाडणारे, गोंधळात टाकणारे अनुभव होय. सिनेमा, नाटके, टीव्ही., रेडिओ, वृत्तपत्रे, मॅगेझिन्स व शिवाय पर्यटन वगैरे अनेक माध्यमातून आणि इतर पालक, मुले, सामाजिक वातावरण यांच्या संपर्कातून हे गोंधळात टाकणारे अनुभव पालकांना येतात.

इतर पालकांच्या संसर्गाने प्रत्येक पालकाच्या मनात असा एक वाद चाललेला असतो की आपल्या मुलांबरोबर आपण वागतो ते योग्य की गैर? कसं वागणं बरोबर ? याचं प्रमुख कारण असं की आजचे पालक अशा परिस्थितीत अडकलेले असतात की त्यांच्यासमोर सकृद्दर्शनी दोनच पर्याय राहतात. एक म्हणजे अमानुष व क्रूर स्पर्धेत भाग घेणे आणि दुसरा म्हणजे आधीच माघार घेऊन 'हौतात्म्य' पत्करणे ! ह्या द्वंद्वामुळे पालकांच्या पर्यायाने बालकांच्या मनामध्ये ताण, तणाव, असंतोष, अस्वस्थता, खळबळ, बेचैनी यांचे तांडव सुरु होते, आणि इतरांनाही संसर्गाची बाधा करते. साहजिकच आपण साधे शांत सद्गृहस्थ राहात नाही. आपल्यातून 'निर्दय, स्वयंचलित यंत्रे," 'हृदयशून्य यंत्र मानव" किंवा उध्वस्त, निराश, उदासिन, उद्विग्न, वैफल्यग्रस्त, व छिद्रान्वेषी अशी माणसे तयार होतात. आपण (व आपल्यासारखे लाखो जण) खऱ्या अर्थाने न जगता पाला पाचोळयाचे निसत्व अस्तित्व असहाय्यपणे स्वीकारतो. याचं कारण अर्थातच असं की आपल्याला मुलांच्या भवितव्याची चिंता एकीकडे बाजूला ठेवता येत नाही आणि दुसरीकडे लादल्या गेलेल्या दुष्ट स्पर्धेत यशस्वीपणे सहभागी होत येत नाही.

ह्या परिस्थितीत मुलांचं खरं हित कशात आहे याचं आकलन होणं अत्यंत महत्वाचं असतं. त्याचप्रमाणे क्रूर स्पर्धेतून मिळणारं यश अखेर काय 'देऊ' शकतं याचीही वास्तव जाणीव यायला हवी. कारण अशी जाणीव आली तरच मुलांचा जाच, आई वडिलांचे क्लेश आणि सत्तास्थानातील लोकांचा आत्मघातकी मनमानी अरेरावीपणा यावर मात करता येईल.

हे साध्य होण्यासाठी आत्मज्ञानाची आवश्यकता आहे. कारण स्वतःच्या कालातीत अस्तित्वाची प्रचीती आपल्याला दिलासा, सामर्थ्य व शांती देते. नामस्मरणानं आपल्याला ही स्थिती प्राप्त होते. नामस्मरण सध्याच्या वातावरणाला पोसणाऱ्या आपण सर्वांची या घातक गदारोळातून सुटका करु शकते.

बालसंगोपनाविषयीचा तपशील शहरे, खेडी व विविध देशांनुसार बदलला तरी एकंदर वातावरणाचे वैशिष्टय सर्वत्र तेच आहे ! त्यामुळे शिक्षणतज्ज्ञ, योजनाकार, अध्यापक, नोकरशहा, शिक्षणसंस्थाधिपती, पालक, मुले आणि मुलांच्या हितासंबंधी आत्मीयता असणाऱ्या सर्वांनीच ईश्वरनामाची कास धरायला हवी. तरच परस्परांना शांती मिळेल आणि सारं वातावरणच नवचैतन्यानं भारलं जाऊन मुलांसकट इतर सर्वांनाच नवजीवन प्राप्त होईल. यातून समृद्धी आणि प्रगल्भतेचे नवे रस्ते मुलांसाठी व आपणा सर्वांसाठी खुले होतील यात शंका नाही.

१८. नामस्मरण व व्यसनाधीनता

जाणीवेला खालच्या पातळीवर खेचणारे व भ्रष्ट करणारे जे जे काही असते त्यावर अवलंबून राहणे म्हणजे व्यसनाधीनता होय. व्यावहारिक दृष्टया पाहता मादक पदार्थांवरील (उदा. मद्य, अफू, मादक द्रव्ये, तंबाखू वगैरे) शारीरिक आणि मानसिक अवलंबन म्हणजे व्यसनाधीनता होय. ह्या पदार्थांविरोधी नेहमी मांडला जाणारा मुद्दा म्हणजे "त्यांच्यामुळे शारीरिक आरोग्य, सामाजिक स्थान, कौटुंबिक जीवन आणि आर्थिक परिस्थितीत बिघाड होतो." हा प्रतिवाद खराच आहे. परंतु व्यसनाधीनतेचा सर्वात अधिक दुष्परिणाम जर कोणता असेल तर तो म्हणजे शुद्ध जाणीव मूळ गाभा किंवा हेतू यावर होणारा होय.

आपल्या जाणीवेच्या स्थितीवरच आपली इतरांविषयीची संवेदना आणि आपली प्रतिक्रिया अवलंबून असते. त्यामुळे संस्कृतीचा गड शुद्ध जाणीवेवर उभारणे आवश्यक आहे. अशा उभारणीमुळे परिणामी समाजाच्या सर्व स्तरातील सर्वांच्या जाणीवेच्या निरंतर शुद्धीकरणाचे काम सुरु राहते.

आजच्या काळात आपल्या जाणीवेवर तर्कदुष्ट, अन्याय्य आणि जुलमी घटनांचे आघात होत असतात. जीवनाच्या सर्व क्षेत्रात हे सर्रास दिसून येतं. सामुहिक कॉपी, नातलगशाही, वशिलेबाजी, स्वार्थांधता, दडपशाही ह्या साऱ्यांचा विकृत प्रभाव विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या मनावर पडतो. लाचलुचपत, जात्यांधता, फसवेगिरी, लबाडी, कारस्थानीपणा यांचा दुष्परिणाम सर्वसामान्यांच्या जाणीवेवर होतो. शोषण आणि छळ ह्यांच्या पीडेचा उपद्रव कष्टकरी-शोषित वर्गाच्या व्यक्तींची मने उध्वस्त करीत असतो. यावर ताण म्हणून संकुचितपणा, कडवेपणा, दहशतवाद आहेतच. ह्या साऱ्यामुळे सद्सद्विवेकबद्धी आणि (संपूर्ण) जाणीव घुसमटून जाते, गुदमरुन जाते.

कुणीही सहृदय जीव विचलित व्हावा, संवेदनाशील मन अस्वस्थ व्हावे अशीच ही स्थिती आहे. साहजिकच या परिस्थितीच्या आघातानं कुणी हिंसेकडे तर कुणी पलायनाच्या साधनांकडे आकर्षित होतो.

जे हिंस्त्र बनतात ते इतरांचाच नव्हे तर स्वतःचाही घात करायला उद्युक्त होतात. त्यामुळे अनेकजण दहशतवाद, गुंडगिरी वा इतर गुन्हे करू लागतात, तर इतर पुष्कळ

लोक आत्मघातकी अतिरेकी मद्यपान, धुम्रपान, मादक द्रव्य सेवन यांच्या आहारी जातात. पलायन वादाच्या भोवऱ्यात अडकलेले मादक द्रव्याप्रमाणेच पार्ट्या, अश्लील सिनेमे, वेश्यागमन वगैरे बाबींमध्ये भरकटत राहतात. त्यामुळे व्यसनाधीनतेवरील प्रभावी इलाज म्हणजे जाणीवेवर होणारे घातक आघात मोडून काढणे, निष्प्रभ करणे. हे नामस्मरणानं शक्य होतं. कारण नामस्मरणानं निःस्वार्थी आनंदाचा झरा गवसतो. त्याचप्रमाणे **सध्याच्या आणि भविष्यकाळातील संस्कृतीचा गाभा व पाया असलेला व अशा संस्कृतीकडे नेणारा चेतनेचा उर्जास्त्रोत सापडतो. नामस्मरणानं निर्भयता येते.** तसेच बेडरपणे स्वतःच्या व इतरांच्या दुष्प्रवृत्तीवर मात करण्याची शक्ती येते. याशिवाय सच्चिदानंदाच्या शुद्ध जाणीवेवर आधारलेली आणि असा आनंद जोपासणारी संस्कृती विकसित करण्यात सहभागी होण्याची क्षमता देते. नामस्मरण करणाऱ्याला सामर्थ्य व प्रेमाचा साक्षात अनुभव येतो. शिवाय या सामर्थ्य व प्रेमातून व्यसनाधीनता गाडून टाकणारी आणि सर्वंकष संपन्नता, सुदृढता व उदात्तता साकारणारी धोरणे स्फुरतात, सुचतात त्याचप्रमाणे नामस्मरण करणाऱ्या इतरांनाही त्यांच्या त्यांच्या क्षेत्रानुसार उपयुक्त धोरणे कशी स्फुरतात याचीही प्रचीती **नामस्मरणाने** येऊ शकते.

१९. नामस्मरण आणि हठयोग

हठयोग हा आत्मज्ञानाच्या प्रवासातील एक मार्ग आहे. हठयोगामध्ये, मानवी आचारविचार-अभ्यासाची-साधनेची आठ अंगे वर्णन केलेली असून ह्यांमुळे वैश्विक परिमाणाची आत्मप्रचीती येते असा विचार मांडला आहे.

हठयोगामध्ये काही प्रवाह असेही आहेत जे वैयक्तिक आनंदाची अनुभूती आणि सिद्धींवर भर देतात. आजकाल तर हठयोगाचे अध्यापन, अध्ययन आरोग्य, मनः शांती, शरीर सौष्ठव, स्मरणशक्ती, एकाग्रता, उत्तम कांती, शारीरिक चिवटपणा यांच्या प्राप्तीसाठी केले जाते. हल्ली हठयोग हा एक व्यवसाय / धंदा झाल्यामुळे तो सामाजिक प्रतिष्ठा व मुबलक अर्थार्जनाचे साधनही बनला आहे. व्यवसाय नोकरीसाठी घेतल्या जाणाऱ्या मुलाखतीत निवड व्हावी म्हणून 'योगाच्या' पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे वापरली जातात.

पुरेशी जागा, साधनांची उपलब्धता या दृष्टीनेही हठयोग ही सर्वसामान्यांना न जमणारी बाब होऊ पाहात आहे. बहुसंख्य कष्टकऱ्यांसाठी हठयोग ही चैनीची बाब ठरू पाहात आहे.

याशिवाय हठयोगापासून होणारे फायदे संदर्भहीन ठरू पाहात आहेत. कारण हठयोगाचे लाभ (शारीरिक व मानसिक शांती) सामाजिक कल्याणमध्ये निरुपयोगी ठरताना आढळतात.

आजच्या परिस्थितीत हठयोगाची पुनर्रचना, अध्यात्मिक अंतःप्रकाशी शहाणपणा आणि वैज्ञानिक तर्कसंगती यावर होणे आवश्यक आहे. वैयक्तिक व सामाजिक विकासाची एकात्मता साधणारी शक्ती हठयोगात आणायला हवी.

हठयोगाला ही चैतन्यप्राप्ती नामस्मरणाने होऊ शकेल. कारण नामस्मरणानं व्यक्तीला स्वार्थातील 'स्व' ची प्राप्ती होते आणि ह्या स्वार्थातीततेची अस्सल प्रचीती येते. या निस्वार्थ 'स्व' भोवती जीवनाची सर्व क्षेत्रे (हठयोग देखील) सुसंघटित करता येतात व खऱ्या अर्थाने विकसित करता येतात, थोडक्यात, नामस्मरणाने हठयोगातील व जीवनातील प्रत्येक कृतीला अध्यात्माचे (विश्र्वकल्याणाचे) आणि निस्वार्थी प्रज्ञेचे परिमाण प्राप्त होते.

२०. नामस्मरण आणि आरोग्य

शारिरिक, मानसिक, सामाजिक व अध्यात्मिक व इतर अनेक दृष्टया निरोगीपणा व उत्तमतेची जाणीव आणि स्थिती म्हणजे आरोग्य होय. या सर्वांमध्ये अध्यात्मिक पैलू सर्वाधिक महत्वाचा आहे. कारण आरोग्याच्या अध्यात्मिक पैलूमध्ये स्वतःच्या व समाजाच्या कल्याणाची दृष्टी, आस्था व कृती अनुस्यूत असते. खऱ्या साधु आणि संतांच्या जीवनातून अध्यात्मिक आरोग्याचे वैशिष्टय आणि महत्व ठसठशीतपणे नजरेत भरते. त्यामुळे आरोग्य हे मूलतः अध्यात्मिक आरोग्यच आहे असेच मानणे योग्य ठरते. सामाजिक, मानसिक, शारीरिक आणि इतर प्रकारच्या सुस्थितीकडे **अध्यात्मिक आरोग्याची साधने** आणि **अध्यात्मिक आरोग्याचे सुपरिणाम** म्हणूनच पाहायला हवे.

याप्रमाणे "अध्यात्मिक आरोग्य प्राप्तीची" साधने अनेक आहेत. शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, तांत्रिक, पर्यावरणात्मक व राजकीय सुस्थिती (आरोग्य) हे अध्यात्मिक उत्तम स्थितीचे (आरोग्याचे) सुपरिणाम आहेत आणि अध्यात्मिक आरोग्याकडे नेणारी वाहनेही आहेत. आरोग्याच्या अध्यात्मिक व इतर पैलूंकडे या दृष्टीनं पाहायला हवं. अध्यात्मिक आरोग्याच्या ह्या आकलनापासून आरोग्याची सध्याची संकल्पना वंचित ठेवता नये. कारण **आरोग्याविषयीची संकल्पनाच खुरटी, अर्धवट, अपुरी, संकुचित व पर्यायाने विकृत व रोगट राहिली** की वैद्यकीय व्यवसायात वाढता क्षुद्रपणा व भ्रष्टाचार फोफावतो. काही उदाहरणांनी हे अधिक स्पष्ट होऊ शकेल. शारीरिक दृष्टया बलदंड असणारा, सधन आणि सुशिक्षित माणूस इतरांच्या सामाजिक छळामध्ये सहभागी असेल तर खऱ्या अर्थाने आरोग्यसंपन्न ठरत नाही. त्याचप्रमाणे जातीय राजकारण, पर्यावरणाचा नाश, अण्वस्त्रांची निर्मिती / व्यापार / दलाली वगैरेंमध्ये सहभागी असणारी व्यक्ती सुशिक्षित, पैशाने श्रीमंत व शरीराने सुदृढ असली तरी निरोगी ठरत नाही. त्याचप्रमाणे अशिक्षित, आर्थिक दृष्टया शोषला जाणारा / पिळला जाणारा व सामाजिक दृष्टया छळला जाणारा माणूस शरीराने भक्कम व मनाने अविचलित (मन मेल्यामुळे) असला तरी आरोग्यसंपन्न ठरत नाही.

नामस्मरणानं अध्यात्मिक आरोग्याची (स्वास्थ्याची) अनुभूती येते. या अनुभूतीमुळे इतरांनाही असे खरे स्वास्थ्य (खऱ्या 'स्व' मध्ये राहणे म्हणजे

स्वास्थ्य म्हणून अध्यात्मिक आरोग्य हेच खरे स्वास्थ्य होय) मिळण्याच्या दृष्टीने आरोग्याचे शारीरिक सामाजिक पैलू (खऱ्या स्वास्थ्याकडे नेणारी वाहने) विकसित होण्यासाठी खऱ्या स्वस्थ व्यक्ती कडून प्रयत्न सुरु होतात. कारण नामस्मरणानं व्यक्तीची (ती डॉक्टर नसली तरी) कल्याणकारी दृष्टी उघडते. त्यामुळे स्वतःच्या क्षेत्रातील प्रत्येक परिस्थितीत माणूस स्वतःचे व इतरांचे स्वास्थ्य जोपासण्याच्या दृष्टीकोनातून वागतो. नामस्मरणाने खऱ्या अर्थी स्वस्थ होणाऱ्याचे स्वास्थ्य त्याच्या आर्थिक धोरणामध्ये, शिक्षणिक धोरणामध्ये तसेच सामाजिक सहिष्णुतेमध्ये व नागरी शिष्टाचारात आविष्कृत होते. अशा आविष्कारातून अध्यात्मिक आरोग्याकडे म्हणजेच खऱ्या स्वास्थ्याकडे नेणारी वाहने सर्व क्षेत्रात विकसित होतात. नामस्मरण ही खऱ्या व सम्यक (संपूर्ण) स्वास्थ्याची / आरोग्याची गुरकिल्ली आहे.

२१. नामस्मरण आणि खेळ

जगभरामध्ये बैठे व मैदानी खेळ कधी करमणुकीसाठी तर कधी स्पर्धेसाठी खेळले जातात. काही खेळ प्रकारात (उदा. रोव्हिंग, स्कीइंग) धोका असतो तर काहीमध्ये (उदा. बिल्लीयर्डस, गोल्फ वगैरे) धोका नसतो.

परंतु फ्रीस्टाईल, कुस्ती व बॉक्सिंगसारख्या 'खेळात' जीवाला धोका असतो. मोटरसायकल वा कार रेसेस देखील अत्यंत धोकादायक ठरु शकतात. उंटांच्या शर्यती तर धोकादायकच नव्हे तर घृणास्पद व क्रूर असतात.

व्यावसायिक तत्त्वावर खेळल्या जाणाऱ्या खेळांमध्ये संकुचित राजकारण आणि हिंस्त्र स्पर्धा असते. यामुळे ॲनॅबोलिक (उत्तेजक द्रव्ये) स्टिरॉईड्स् सेवन करणे, वेगवेगळया लांड्या लबाड्या करणे, लाखो डॉलर्सचे बेटिंग करणे, अत्यंत बालवयापासून ट्रेनिंगचा बडगा देणे, अशा अनेक बाबी उद्भवतात. एशियाड, ऑलिंपिक आणि इतर स्पर्धांना आता एक कृत्रिम आणि कुटिल कारवायांची बाजू तयार होऊ लागली आहे. पदकांच्या हव्यासामुळे खिलाडू वृत्तीची जागा निर्दय स्पर्धावृत्तीने घेतली आहे.

या सर्वांचा निष्कर्ष काय निघतो याचा विचार व्हायला हवा. खेळातून मैत्री व्हायला हवी. त्यांच्याद्वारे कौशल्याच्या प्रदर्शनाला संधी मिळायला हवी. त्यांच्यामुळे लोक एकत्र यायला हवेत व त्यांना सहभागाचे समाधान मिळायला हवे. खेळही शारीरिक आणि मानसिक विरंगुळा, करमणुक व आरोग्याची बाब आहे. त्यांच्याद्वारे राक्षसी वृत्ती व शत्रुत्वाचं स्थित्यंतर होऊन सुसंस्कृत मैत्री तयार व्हायला हवी आणि पदलालसेने भ्रमिष्ट झालेल्या क्रीडाभ्यासाचे परिवर्तन **उत्तमतेच्या पाठ पुराव्यात** व्हायला हवे.

नामस्मरणामुळे आपण खेळ व त्यांचा विकास अंतः प्रकाशानुवर्ती बनवू शकतो. तसेच अंतःप्रकाशामुळे सर्व खेळ अधिक सुसंस्कृत अधिक माणुसकीपूर्ण बनवू शकतो. त्याचप्रकारे नामस्मरणामुळे गिरिकंदरातून, दऱ्या खोऱ्यातून, जंगलावनातून राहणाऱ्या देशाच्या कोनाकोपऱ्यातल्या लोकांना खेळ कसे उपलब्ध होतील याबद्दल आस्था व युक्त्या मनात येऊ लागतात. एवढच नव्हे, तर नामस्मरणामुळे वेगवेगळया राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व इतर क्रीडा स्पर्धा-उत्सवांवर व त्यांच्या आयोजनांवर किती पैसा, किती वेळ व किती शक्ती खर्च करावी याबद्दलही आपल्या डोक्यात प्रकाश पडू लागतो.

२२. नामस्मरण आणि रुग्ण

शारीरिक आणि मानसिक व्यथा जीवनाची अविभाज्य अंगे आहेत. कधी आपल्याला छोटी दुखणी होतात उदा. सर्दी, खोकला, ताप, डोकेदुखी वगैरे व कधी कधी मोठी दुखणी, उदा, क्षय, विषमज्वर, जठराचा व्रण, मूतखडा, प्रोस्टेटची वाढ वगैरे. मोठ्या दुखण्यांमध्ये दीर्घकालीन अशी औषधी वा शल्य चिकित्सा लागते. कधी कधी दुखण्यानी अती वेदना होतात तर कधी अपंगत्व येतं. कधी कधी तर सर्वच क्लेश एकत्र येतात. न भरणारे व्रण, मेंदूच्या आवरणाचा दाह (मेनिजायटिस), अस्थि व्रण (ऑस्टिओमायलायटिस), ट्रायजेमिनल न्यूराल्जिया (मेंदूतील एका नसेचा दाह), ग्लॉकोमा (डोळयातील दाब वाढणे व अंधत्वाची शक्यता निर्माण होणे), नागीण (हर्पिस झोस्टर), जळणे-भाजणे, अस्थिभंग (फ्रॅक्चर) वगैरे व्याधींमध्ये वेदना आणि विकृती दोन्ही होऊ शकतात, कर्करोग, एडस्,रेबीज्, अल्झायमर्सचा रोग असे काही रोग जीवन सर्वतोपरी उध्वस्त करतात. अंधत्व, बहिरेपणा, लकवा, अपघात वगैरेंमुळे विकृती व शारीरिक क्षमतेचा व कार्यकुशलतेचा नाश वा ऱ्हास होतो. मानसिक खुरटलेपणा, मेंदूच्या आवरणाचा दाह, मल्टीपल स्क्लेरोसिस, स्कीझोफ्रेनिया, मॅनिक डिप्रेसिव्ह सायकोसिस, फ्रजायल एक्स सिंड्रोम, केटोन्युरीया व हायड्रोसेफॅलस वगैरे मध्ये भयानक मानसिक दोष व कार्यक्षमतेतील वैगुण्ये असू शकतात.

नामस्मरणानं आमची दृष्टी खऱ्या अर्थानं सम्यक स्वास्थ्याचे आकलन करु लागते. आम्ही डॉक्टर, रुग्ण व रूग्णांचे नातलग कुणीही असलो, तरी हा फायदा होतो. उपचार व प्रतिबंध यांद्वारे **सम्यक् स्वास्थ्य** साधण्यामध्ये **अध्यात्मिक स्वास्थ्य अनुस्यूत असते व वैद्यकातील मुलतः एक असणाऱ्या पण भिन्न भासणाऱ्या सर्व तथाकथित शाखांचा सुबुद्ध वापर असतो. सम्यक स्वास्थ्याची दृष्टी ही एकांड्या उपचार / प्रतिबंधा पेक्षा फारच श्रेष्ठ व प्रभावशाली आहे.**

सम्यक् स्वास्थ्यामध्ये आणखी एक वैशिष्टय असे की रुग्णाची स्वतःची शक्तीही लक्षात घेऊन व तिचे महत्व जाणून रोगनिवारण व स्वास्थ्य संवर्धनासाठी तिचा वापर केला जातो. त्याचप्रमाणे इतर मानसिक आधारांनाही योग्य ते महत्व दिले जाते. सम्यक स्वास्थाच्या दृष्टीमुळे डॉक्टर, परिचारिका, इतर सेवक व रुग्णाच्या नातेवाईकांप्रमाणेच रुग्णानीही शक्यतो नामस्मरण करणे महत्वाचे आहे हे सर्व संबंधितांना अधिकाधिक

पटू लागते. रुग्णांनी केलेल्या नामस्मरणामुळे रुग्णांच्या आंतरिक शक्तीचा स्त्रोत खुला होऊन हा स्त्रोत रोगनिवारणामध्ये व स्वास्थ्यसंवर्धानामध्ये महत्वाची भूमिका बजावतो.

फार पूर्वीपासून सर्व उपाय थकले की शेवटच्या उपायासाठी रुग्णांना तीर्थक्षेत्री नेण्याची पद्धत आहे. गंभीर आजारांमध्ये रुग्णांच्या बिछान्याशेजारी बसून धार्मिक पोथ्या वाचल्या जातात. पुराण-हरिपाठ केले जातात, प्रार्थना केल्या जातात. ह्या साऱ्यांचे मूलभूत तत्व म्हणजे रुग्णाला सामर्थ्यवानं अशा 'स्व' रुपाकडे आकर्षित करणे. नामस्मरणानेही हेच घडते.

नामस्मरणानं रुग्णाचे चित्त हळुहळु उदात्ततम व विशालतम अशा नामरुपातील 'स्व' शी निगडित होऊ लागते. यामुळे वेदनांची संवेदनाच पालटते. पाण्यावर ओरखडा उमटत नाही त्याप्रमाणे वेदनांची भीती व परिणाम अगदी कमी होतात. यातना व भोगात गुंतून पडायला होत नाही. व्याधीमुळे खचून जाण्याची, निराश होण्याची आत्मघातकी प्रक्रिया नामस्मरणामुळे नष्ट होते व तिची जागा सामर्थ्यशाली व विजयोत्सु प्रतिसाद घेतो.

इतर उपचार चालू असताना नामस्मरण केल्यास त्याचे फायदे होतात याविषयी सामान्य बुद्धी (कॉमनसेन्स) असलेल्या सामान्य माणसामध्ये तरी संशय नाही एवढे नक्की !

मानसिक ताण, तणाव, रक्तदान, निद्रानाश, स्पाँडिलोसिस, जठराचा व्रण (पेप्तिक अल्सर) जठराचा दाह, आणि इतर वेदनादायी व्याधींमध्ये नामस्मरणाचा उपयोग होईल, यात शंका नाही. कारण ह्या व्याधींमागील एक महत्वाचे कारण व पैलू म्हणजे खऱ्या 'स्व'चा विसर पडल्यामुळे दृष्य घटनांमागून फरफटत व जर्जर होत जाण्याची प्रक्रिया होय.

२३. नामस्मरण आणि क्रांत्या

समाजामध्ये जे जे अन्याय, दडपशाहीच, शोषक आणि समाजघातकी वाटतं ते झपाट्यानं आणि आमुलाग्र बदलण्याच्या प्रक्रियेला क्रांती म्हणतात. परंतु क्रांतीच्या स्वरुपाविषयीचे दृष्टिकोन विभिन्न असतात. काहींना क्रांतीमध्ये वर्गमुक्त समाज अभिप्रेत असतो तर काहींना त्यांच्या धर्माचे सार्वभौमत्व. काहीना वांशिक वर्चस्व प्रस्थापित करायचं असतं तर काहीना स्वतःची साम्राज्य स्थापना वगैरे इतर बाबी अभिप्रेत असतात. याशिवाय सांस्कृतिक, आर्थिक, वैज्ञानिक, तांत्रिक, औद्योगिक आणि अशा इतर पैलूंमध्ये जे परिवर्तन घडते त्यांनाही क्रांती म्हणतात. उदा. औद्योगिक क्रांती, हरित क्रांती, सफेद क्रांती वगैरे.

क्रांतीकारक चळवळींमध्ये काही बाबी समान असतात.

१. संबंधित संघटनांना ज्या सामाजिक बाबी अयोग्य वाटतात त्यांना विरोध.

२. जगाविषयीचा दृष्टीकोन, धोरणे, योजना, डावपेच, कृति वगैरेविषयी एक रुपरेषा व तपशील बनवणे.

३. भविष्यकालीन समाजाचे तपशीलवार चित्र रेखाटन.

४. विश्र्वाला जोडणाऱ्या खऱ्या ‘स्व’ चा विसर किंवा अज्ञान .

५. कडवेपणा.

६. संपूर्णपणे वाहून घेतलेले अनुयायी.

७. गुप्तपणा आणि उच्चपदस्थांविषयी पूर्ण श्रद्धा, भक्तिभाव व इतरांवर दरारा

८. पुष्कळदा संघटनेबाहेरील पक्षाबाहेरील किंवा स्वदेशाबाहेरील स्वार्थाधांबरोबर कळत-नकळत उघड वा छुपी हात मिळवणी.

अशा ह्या विविध प्रकारच्या क्रांत्या, त्यांची सामाईक वैशिष्टये आणि त्यांचे विरोधक ह्यांच्याकडे एक नजर टाकली असता जाणवते की आजच्या काळात **(विवेकाचे) नियंत्रण नसलेली व मोकाटपणे उधळलेली बुद्धी हा मानवी समाजाचा सर्वात मोठा शत्रु आहे.** मानसशास्त्रीय, जीवशास्त्रीय व आण्विक शस्त्रास्त्रांच्या रुपातील बुद्धी पहा कशी वासना, भावना, हाव गर्व, पूर्वग्रह आणि हीनपणाच्या तालावर घातक व हिंस्त्र

धुडगूस घालीत आहे.

क्रांतीकारक मंडळींच्या (व इतरांच्या) ध्येयामागील शुद्ध भाव यशस्वी व्हायचा असेल तर सर्व तऱ्हेच्या संकुचितपणावर मात करायला हवी. नामस्मरण करणाऱ्या कुणालाही हे शक्य आहे. कारण नामस्मरणामुळे आम्ही आमच्या द्रष्टया पूर्वजांची दृष्टी प्राप्त करु शकतो. यामुळे घट्ट समजुती व कर्मकांडे यातील अयोग्य तपशील बाजूला करता येतो. नामस्मरणानं भूतकाळातील सर्वोत्तम बाबींचे ग्रहण करता येते आणि वर्तमानात त्यांचा सुयोग्य उपयोग करता येतो. नामस्मरणानं वेगवेगळया क्षेत्रातील व्यक्तींच्या हृदयात द्रष्टया पूर्वजांना वेळोवेळी जाणवलेली ज्योति प्रकाशते. ती ज्योती त्यांना अनुभवता येते व स्वतःच्या क्षेत्रानुसार जीवनात आविष्कृत करता येते. अंतः प्रकाशाचा असा आविष्कार हीच सर्वाधिक कल्याणकारी क्रांती होय. अशा क्रांतिकारक प्रक्रियेत विचारसरण्या विज्ञान आणि तंत्रज्ञान डोळयांप्रमाणे काम करतात. निकोप दृष्टीसाठी डोळयांची मदत होते हे आपल्याला माहीत आहे. परंतु केवळ डोळे, दृष्टीसाठी आवश्यक असे **मेंदूच्या भागांचे कार्य करु शकत नाहीत. नामस्मरण हे दृष्टीमध्ये महत्वाचे कार्य बजावणाऱ्या मेंदूच्या भागांसारखे** आहे. हे जाणणारा कुणीही सूज्ञ माणूस डोळयाप्रमाणे कार्य करणाऱ्या विचार, विज्ञान व तंत्रज्ञानाचे आणि मेंदूच्या भागांप्रमाणे कार्य करणाऱ्या नामस्मरणाचे महत्व नाकारणार नाही.

नामस्मरणाला मर्यादित अर्थाने प्राणवायूची उपमाही देता येईल, प्राणवायुप्रमाणेच नामस्मरण सर्व जातीच्या, पंथांच्या, धर्मांच्या, प्रांतांच्या, वंशांच्या, पक्षांच्या, विचारसरणीच्या लोकांना सामाईक व अत्यावश्यक आहे. याउलट वेगवेगळया चालीरीती, प्रथा, परंपरा, पूजापद्धती, नीती कल्पना, संकेत हे वेगवेगळया स्वयंपाक पद्धतीसारखे वैकल्पिक आहेत. स्वयंपाक पद्धती जशा विविध प्रकारच्या असल्या तर काही बिघडत नाही तसेच परंपरा वगैरे देखील विविध प्रकारच्या असल्यास त्यात काहीच वावगे नाही.

या घडीला मेंदूचे विविध भाग म्हणजेच नामस्मरण आणि डोळा म्हणजे विचार, विज्ञान, तंत्रज्ञान यांची सांगड घालायला हवी. तरच या जगामध्ये आपण 'सत्याचे वा ईश्वराचे दर्शन' साध्य करू शकू आणि अंतःप्रकाशाची अनुभूती व अविष्कार म्हणजेच "सुपरलिव्हिंग" प्रत्यक्षात आणू शकू.

२४ नामस्मरण आणि डॉक्टरांच्या मनातील द्वंद्व -

पुष्कळदा असं आढळतं की उपचारांसाठी आलेल्या रुग्णाने बलात्कार, चोरी, लुटमार, मारामारी, दंगेधोपे, खून वगैरेसारखे एक वा अनेक गुन्हे केलेले आहेत. कायदे व संकेतांच्या बडग्याखाली अशा रुग्णाला उपचार केले तरी उपचार करणाऱ्या डॉक्टरच्या मनात, आपण करतो ते योग्य की अयोग्य ? असा संभ्रम तयार झाला तर नवल नाही या उलट कधी कधी उपचारांनंतर बरा झालेला रुग्ण एक वा अनेक गुन्हे करतो. साहजिकच डॉक्टरच्या मनामध्ये वैद्यकीय सेवेबद्दल शंका-कुशंका व संभ्रम तयार होतात. वैद्यकीय सेवा ही खरोखरच सेवा तरी आहे का असा संशय निर्माण होतो.

कधी कधी डॉक्टर फी आकारीत नाही. पण कालांतरानं तोच रुग्ण जेव्हा डॉक्टरला न पटणाऱ्या बाबींवर उधळपट्टी करतो तेव्हा डॉक्टरचं मन विषण्ण होत.

बऱ्याच वेळा असं दिसतं की आदर, लोकप्रियता, कीर्तीचा झगमगाट बेरकी व कारस्थानी डॉक्टरांकडे जातो तर प्रामाणिक आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या वाट्याला कुचेष्टा व निर्भत्सना येते.

ही सामाजिक परिस्थिती वैयक्तिक आणि सामाजिक आरोग्याला हानिकारक आहे. वैयक्तिक दृष्टीकोन आणि कृती आणि सामाजिक परिस्थिती हे दोन्ही परस्परपोषक असल्यामुळे डॉक्टरांच्या मनातील या द्वंद्वावरील उपाय एकाच वेळी वैयक्तिक व सामाजिक अशा दोन्ही पातळयांवर प्रभाव पाडणारा असला पाहिजे. नामस्मरण अगदी नेमका असा उपाय आहे. क्षुद्रत्वावर मात करुन सामाजिक उत्थानाला उपयुक्त असे दृष्टीकोन, धोरणे योजना आणि कृती करण्यामध्ये नामस्मरण व्यक्तीला सहाय्यभूत ठरते. कारण आरोग्य, आरोग्याची जोपासना, सम्यक वैद्यक, वैद्यकीय शिक्षण, वैद्यक क्षेत्रातील नीतीशास्त्र वगैरे बाबींचा खरा गूढार्थ व मतितार्थ नामस्मरणानं कळू लागतो. नामस्मरण केवळ डॉक्टरांनाच नव्हे तर चुकणाऱ्या - माकणाऱ्या -बहकणाऱ्या आणि क्वचित आजाराबरोबरच प्रमाद वा गुन्ह्यांच्या आहारी जाणाऱ्या आम्हाला वा आमच्यातल्या इतरांना उपयुक्त ठरेल.

नामस्मरण व्यक्तिला तिच्या अंतर्यामाद्वारे सर्वांच्या विश्वाची मूलाधार अशी जी चैतन्यमय जाणीव आहे त्या जाणीवेशी निगडित करते, संलग्न करते. ही प्रक्रिया व्यक्तीला जाणवते आणि जाणवत असतानाच व्यक्ती-व्यक्तींना प्रत्यक्षात जोडते. अशा

तऱ्हेने विश्वनियंत्रक चैतन्याच्या माध्यमातून विभिन्न व्यक्तींची अंतःकरणे जोडली जातात. अशा तऱ्हेने एका व्यक्तीच्या अशा ''आत्मज्ञानामध्ये'' व ''आत्मप्रचीती मध्ये'' नामस्मरण न करणाऱ्या इतरांनाही मुक्त/स्वतंत्र करणारा व एकात्म करणारा दुसरा वास्तविक व प्रत्यक्ष पैलू आहे. ह्या प्रभावाचे पदार्थविज्ञानशास्त्रीय वा रसायनशास्त्रीय वा मानसशास्त्रीय स्वरुप सांगता येत नाही. कारण ही ''शक्ती'' मनमानीपणे दुसऱ्यावर अधिकार गाजविण्यासाठी वापरली जाणारी शारीरिक, राजकीय, मानसिक वा तत्सम प्रकारची शक्ती नाही. हा प्रभाव निसर्गनियमानुरुप असून इतरांना जाचणारा वा बांधणारा नाही, त्यांना मुक्त करणारा आहे.

नामस्मरण डॉक्टर रुग्ण आणि सर्व संबंधितांना त्यांच्यातील आंतरिक एकात्मतेमुळे एक ध्येय, एक मिशन व एक हेतू देतं. हेच खऱ्या व संपूर्ण आरोग्याचं - 'स्वास्थ्याचं' सर्वोच्च स्वरुप आहे. यावरुन नामस्मरण हे रुग्ण, डॉक्टर व समाजाच्या ''त्वचेपासून'' ते ''आत्म्यापर्यंत'' सर्व पातळयांवर पसरलेल्या सर्वात महत्त्वाच्या अशा अध्यात्मिक विकृतीचं, अस्वास्थाचं उच्चाटन करणारं रामबाण औषध आहे हे सहज लक्षात येईल.

२५. नामस्मरण आणि कायदेतज्ज्ञ

कायदे म्हणजे वागणुकीचे नियम. वेगवेगळ्या पातळ्यांवर असे नियम केले जातात. अशा तऱ्हेने बहुपक्षीय करार विविध देशांदरम्यान केले जातात. ते करार तसेच युनायटेड नेशन्स ऑर्गनायजेशन (युनो) तर्फे केले गेलेले करार राष्ट्रांच्या वागणुकीवर नियंत्रण ठेवतात. त्याचप्रमाणे वेगवेगळे प्रांत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांवर नियंत्रण ठेवणारे करार देखील केले जातात. हे सर्व विश्व कल्याणासाठी केले जावे अशी अपेक्षा असते. या शिवाय वेगवेगळ्या व्यक्तींच्या आचारणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारी नियम देखील असतात. शिवाय वेगवेगळ्या धर्मांच्या अनुयायांसाठी धर्माज्ञा असतात. त्यांचा हेतु धर्माच्या अनुयायांची वागणूक आणि विविध धर्मातील परस्परसंबंध यांवर नियंत्रण ठेवण्याचा असतो.

कायदेतज्ज्ञांना कायदे विकसित करण्याची आणि शब्दाबद्ध करण्याची आणि त्याद्वारे वैयक्तिक व सामूहिक आचरण हितकारक पद्धतीने नियंत्रित करण्याची खास संधी असते. हेतू असा की ते आचरण वैश्विक कल्याणाला पूरक ठरावे. त्याचप्रमाणे राष्ट्रघटनांचा अभ्यास व विकास करून विभिन्न लोकसमूहांच्या जाणीवांवर व आचरणांवर प्रभाव पाडण्याची सुवर्णसंधी देखील कायदे तज्ज्ञांना असते.

कोर्टात केस लढवण्याइतपतच कायदेतज्ज्ञांच क्षेत्र मर्यादित करणं बरोबर नाही. कायद्यातल्या आशय, शब्दांकन आणि अंमलबजावणीतील पळवाटांमुळे खरी केस हरावी लागली तर **कायदेतज्ज्ञाला येणारी खिन्नता** आपण व त्यांनीही लक्षात घ्यायला हवी. त्याचप्रमाणे गुन्हेगारांची निर्दोष सुटका झाली व निर्दोष व्यक्तींना शिक्षा झाली तर त्याचा **समाजावर कसा विपरित परिणाम** होतो हे देखील लक्षात घ्यायला हवं. **कायद्याशी संबंधीत नसलेल्याही सज्जन माणसांवर** याचा खच्ची करणारा, विषण्ण करणारा व निराश करणारा प्रभाव पडतो.

कायद्याच्या क्षेत्रातील अपप्रवृत्तींचा भस्मासूर अशा परिस्थितीत कॅन्सरप्रमाणे वाढतो. पण सर्वात महत्वाचं म्हणजे कायदेपद्धतीचं अशा तऱ्हेचं खच्चीकरण म्हणजे कोणत्याही देशातल्या **समाजावर होणारा प्राणघातक वज्राघात असतो.**

नामस्मरण करणाऱ्या कायदेतज्ज्ञाला स्वतःच्या संकुचितपणाच्या अतीत जाता

येत आणि कायद्यांमध्ये योग्य वेळी व योग्य जागी सुधारणा करण्याची गरज तीव्रतेने जाणवू शकते. ही बाब स्वतःच्या रोजच्या व्यवहारातलीच आहे, हे नामस्मरण करणाऱ्या कायदेतज्ज्ञाला जाणवू शकतं. कायदेतज्ज्ञांच्या मनातील ही भावना त्यांना आनंद देऊ शकते व त्यांच्या योगदानाने कायदेप्रणालीला विकोपता व नवसंजीवन देऊ शकते.

नामस्मरणामुळे अचुक कायदे बनवण्यासाठी अत्यावश्यक अशी वैश्विक कल्याणाची दृष्टी प्राप्त होते. नामस्मरणाच्या अभावी, वैयक्तिक संवेदना आणि स्वार्थ कायद्यांचा आशय व शब्दांकन यात बाधा आणू शकतात.

समाजात वितुष्ट निर्माण करणारे व व्यक्तीचे समाधान हिरावून घेणारे कायदे वेगवेगळया देशात कसे आहेत याचे कितीतरी उदाहरणे देता येतील. कायदा बनवणाऱ्यांची संकुचित आणि व्यक्तिसापेक्ष मनोधारणा याला जबाबदार असते. त्याचप्रमाणे ह्या कायद्यांसमोर शरणागती पत्करणारे आणि हे कायदे राबवणारे यांच्या अज्ञानामुळेही हे घडतं. नामस्मरण आम्हा सर्वांनाच वैयक्तिक क्षुद्रपणातून बाहेर यायला, बौद्धिक तरलता वाढवायला आणि सद् सद्विवेक वाढवायला मदत करतं. अशा प्रकारे चुकीचे कायदे सुधारण्याचे उपाय नामस्मरणानं सुचू शकतात. नामस्मरणानं दोषपूर्ण वा अन्याय्य कायद्यांना विरोध करण्याची ताकद येते. तसेच कायद्यांच्या अंमलबजावणी दरम्यान परखड आत्मनिरीक्षण करण्याची कुवत नामस्मरणानं येऊ शकते. नामस्मरणानं मनात जो प्रकाश पडू लागतो, त्यामुळे कायद्यातल्या त्रुटी समजू लागतात आणि कायद्यात योग्य फेरफार करण्याची व **अचुक नवीन कायदे** करण्याची क्षमता येते. अशा तऱ्हेनं नामस्मरणामुळे व्यक्ती आणि समाज अज्ञानांधकार आणि रासवटपणाच्या घातक प्रभावातून प्रगल्भ मुक्तिकाव्यानं रसरसलेल्या कायद्यांच्या स्वातंत्र्यदायी प्रभावात प्रवेश करुन मुक्तीचं जीणं जगू शकतात.

पुष्कळसे कायदेतज्ज्ञ पुढे राजकारणात प्रवेश करतात. ते पुढे विधिमंडळ, लोकसभा वा अन्य कायदे बनवणाऱ्या संस्थांचे सदस्य बनून नवीन बिलं संमत करुन घेऊन नवीन कायदे करु शकतात. अशा स्थानी असणारे कायदेपंडित सुयोग्य कायदे विकसित करण्याचं उत्कृष्ट कार्य करु शकतात. नामस्मरण ह्या सर्वांना त्यांचं कायद्याचं ज्ञान सुयोग्यपणे वापरण्याची प्रेरणा, दिशा व क्षमता देतं.

२६. नामस्मरण आणि भीती

भयंकर परिस्थिती किंवा भयानक परिस्थितीच्या कल्पनेनं क्लेशदायी अशी भीती उत्पन्न होते. थोडक्यात, धोक्याच्या जाणीवेनं उत्पन्न होणारी ती एक यातनादायी अनुभूती आहे.

अखेर हा धोका असतो तरी कसला ?

स्वतः विषयीची जी कल्पना असते, जाणीव असते ती, एखाद्या धक्क्यानं कोळमडण्याची उध्वस्त होण्याची वा जायबंदी होण्याची ही भीती असते. म्हणजेच स्वतःची प्रेमाची नाती, अपेक्षा-आकांशा, संकल्पना-धारणा, सामाजिक प्रतिष्ठा-स्थान, श्रद्धा, विचार, भावना वा स्वतःच शरीर यांना धोका उत्पन्न होतो तेव्हा भीती उत्पन्न होते. नामस्मरणानं स्वतःविषयीची जाणीव स्थित्यंतरित होते. तसंच विश्वाविषयीचं आकलन देखील स्थित्यंतरित होतं. नामस्मरणानं आपण बदलत्या, क्षणभंगूर आणि **परिणामस्वरूप** वास्तवतेच्या अतीत जातो आणि विश्वाच्या व आपल्या गाभ्याशी म्हणजेच विश्वाचं अंतर्याम जोडणाऱ्या **अंतीम सत्याशी-महाकारणाशी** तद्रुप होतो. या प्रचीतीच्या केवळ झलकेमुळे आपण परिस्थिती आणि 'स्वतःच सत्य स्वरुप जाणू शकतो. ह्यामुळे सकृदर्शनी भीतीदायक परिस्थितीचा 'मुखवटा' फाडला जाऊन तिचे क्षणभंगूर आणि निरुपद्रवी असे मूळ स्वरुप उघड होते. त्याचप्रमाणे नामस्मरणामुळे आपल्याला स्वतःचे शरीर, मन, विचार, सामाजिक यशापयश वगैरे सारं काही स्वतः च्या केवळ 'सावल्या' असल्याचं ध्यानात येऊ लागतं. त्यामुळे ह्या कोणत्याही बाबींवर अवलंबून नसलेल्या अशा महास्वरूपाच्या अविचल सामर्थ्याचा साक्षात्कार होतो. आणि परमशांतीचा लाभ होतो.

आजच्या जगाला ज्ञात असलेले सर्वतोपरी निर्भय व्यक्तिमत्व म्हणजे महात्मा गांधी. त्यांच्या मनाला भीतीचा स्पर्शही नसे. त्यांच्या जीवनातील सर्वात महत्वाची बाबा म्हणजे नामस्मरण होय.

अशा तऱ्हेनं, वेदना, विश्वासघात, बौद्धिक भ्रमनिरासाचा तडाखा, सामाजिक नामुष्की, राजकीय पराभव, स्वतःच्या आप्तांचा व स्वतःचा मृत्यू वगैरे सर्व ज्ञात व अज्ञात भयावह बाबींवर नास्मरणानं विजय मिळवता येतो. नामस्मरण हा निर्भयतेचा

अजरामर अणि जाज्वल्य असा महास्त्रोत आहे. आजच्या जगाला ज्ञात असलेले सर्वतोपरी निर्भय व्यक्तिमत्व म्हणजे महात्मा गांधी. त्यांच्या मनाला भीतीचा स्पर्शही नसे. त्यांच्या जीवनातील सर्वात महत्वाची बाबा म्हणजे नामस्मरण होय.

अशा तऱ्हेनं, वेदना, विश्र्वासघात, बौद्धिक भ्रमनिरासाचा तडाखा, सामाजिक नामुष्की, राजकीय पराभव, स्वतःच्या आप्तांचा व स्वतःचा मृत्यू वगैरे सर्व ज्ञात व अज्ञात भयावह बाबींवर नास्मरणानं विजय मिळवता येतो. नामस्मरण हा निर्भयतेचा अजरामर अणि जाज्वल्य असा महास्त्रोत आहे.

२७. नामस्मरण आणि वैद्यकीय व्यवसाय

धदेवाईक लांड्या लबाड्यात न बुडलेल्या अशा कुणीही वैद्यकीय व्यावसायिकाला अनेक प्रकारचं कौशल्य, ज्ञान, कष्टाळूपणा, योजना बनवण्यासाठी दृष्टी व क्षमता, व्यवस्थापकीय कुवत, पूर्वग्रहदूषित असं स्वच्छ मन, बेडर काळीज लागतं. आणि या सर्वांसाठी 'साक्षात्कारी आत्मा' लागतो.

वैद्यकीय व्यावसायिकांचा संबंध जीवाशी येत असल्यामुळे वरील गुणविशेष त्यांच्यात प्रकर्षाने असायला हवे. या गुणांचा त्यांचे आकलन, भावना, विचार, जीवनाविषयीचा दृष्टिकोन यावर प्रभाव पडतो व या सर्वांचा मनुष्यजीवनावर परिणाम होत असतो. वैद्यकीय व्यवसायामध्ये एक खास वैशिष्टय आहे. वैद्यकीय व्यवसायात जीवनाचा अभ्यास, शोध व उपचार 'जीवन'च करतं. यामुळे वैद्यकीय व्यवसाय कल्पनातीत गुंतागुंतीचा झाला आहे. टेस्ट ट्यूब बेबी, गुणसूत्रांचे तंत्रज्ञान वगैरेंनी निर्माण केलेले प्रश्न गहन आहेत. तसेच जीवघेणे रोग आणि कायमचे पंगुत्व त्यांच्या मानसिक, कौटुंबिक आणि सामाजिक परिणामांमुळे रोग्यांचे जीणे व उपचार दुरापास्त करतात. त्यामुळे मर्सी किलिंग किंवा युथेनेशिया म्हणजे करुणेपोटी वध करणे, कर्करोगामधील औषधोपचार वगैरे बाबींमध्ये निर्णय घेणे फायच दुष्कर असते. यावरुन लक्षात येईल की वॉर्ड बॉय, सफाई कामगार, परिचारिका, तंत्रज्ञ, लस टोचणारा, अध्यापक व्यवस्थापक, योजनाकार वगैरे विविध भूमिकातील वैद्यक क्षेत्रातील विविध व्यावसायिकांना निस्पृह आणि अंतःसाक्षी हृदय, मन व आत्मा असायला हवा.

कोणत्याही कामात गुंतलेली व्यक्ती नामस्मरणाच्या आधारे स्वतःच्या कामातील मूलभूत सुधारणा अनुभवू शकते. याचं कारण नामस्मरणानं पूर्वग्रह आणि क्षुद्र / संकुचित हाव नष्ट होऊन मन साफ होतं. परिणामी एखादा शल्यतंत्र शस्त्रक्रियेविषयी योग्य निर्णय घेईल. तर योजनाकार निस्वार्थी दृष्टीमुळे कल्याणकारी व प्रभावी दृष्टीकोन, धोरणे व योजना बनवू शकेल.

नामस्मरणानं खऱ्या व उच्चतम स्वास्थ्याचा अनुभव येतो. यालाच मी पुष्कळदा **सुपरहेल्थ** म्हणतो. अशी अनुभुती आजच्या (रोगट, दूषित व निर्णय, विचार, भावना कृती यावर घातक परिणाम करणाऱ्या) वातवरणात विशेष करुन आवश्यक आहे. कारण असल्या वातावरणात हातून अधिक सहजासहजी प्रमाद घडतात, गुन्हे घडतात.

यामुळे वैद्यकीय क्षेत्राचे सर्वच पैलू किडले जातात.

नामस्मरणामुळे सामाजिक वातावरण शुद्ध करणारे व स्वतःला समाधान देणारे कर्तव्य/स्वधर्म समजते व कृतीही त्याप्रमाणे आविष्कृत होते. कारण नामस्मरणानं व्यक्ती नियंत्रक व मुक्तीदात्या तत्त्वाशी एकजीव होते. कट प्रॅक्टीस (कमिशनबाजी / दलाली), नालतग, वशिलेबाजी, पैशाची कर्करोगासारखी व संसर्गजन्य अशी जीवघेणी हाक. असुरक्षितता, निर्दय-निगरगट्टपणा हे वैद्यक क्षेत्राला जडलेले रोग नामस्मरणानं दूर होऊ शकतात. या दृष्टीनं नामस्मरण हे एक दिव्य संजीवनीच आहे.

२८. नामस्मरण आणि कौटुंबिक जीवन

साऱ्या प्राणीजीवनाचं एक मोठं वैशिष्टय म्हणजे कुटुंबव्यवस्था निसर्गाच्या द्रष्टेपणाचा एक भाग म्हणूनच की काय शरीर, मूळ जाणीवा, वासना, भावना, यांच्या जीवशास्त्रीय परस्परपोषकतेने नटलेली कुटुंबसंस्था विकसित झाली आहे. त्यामुळेच की काय आत्मीयतेने समरसून बालसंगोपन करणारी स्त्री असो वा प्राण्याची मादि - तिच्या दर्शनानं नजरेचे पांग फिटतात.

मानवी कुटुंब व्यवस्था अनेक स्थित्यंतरांमधून जात आता उध्वस्त होण्याच्या बेतात आहे. काही भागात ती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे तर काही ठिकाणी ताण-तणाव -कटुतेने किडत चालली आहे.

आज कुटुंब घटकांमध्ये बेदिली आणि विसंवाद आढळतो. वृद्ध, अपंग, रोगी. तान्हे जीव आणि अशा असहाय्य व परावलंबी अश्रापांचं जीवन या स्थितीत फारच हलाखीचं असतं.

वेगवेगळया पार्श्वभूमीच्या लोकांमध्ये कौटुंबिक कलहांचा / कटकटीचा तपशील सारखा असतो असं नाही. परंतु एक बाब समान वाटते. ती म्हणजे स्वतःकडून वा इतरांकडून केलेल्या अपेक्षाच्या भंग होय. यामुळे स्वतःविषयी कीव/घृणा व इतरांविषयी तिरस्कार उत्पन्न होऊ शकतो. त्यामुळे कुटुंबीय मंडळी स्वतःविषयी व इतरांविषयी निर्दय व क्रूर बनतात. मानवी समाजामध्ये अपेक्षांना वेगवेगळी परिमाणं व रुपं प्राप्त झाली आहेत. परंपरा, संकेत, कायदे वगैरे अनेक स्वरुपात प्रगट होणाऱ्या "अपेक्षा" कुटुंबात महत्वाची भूमिका बजावतात, सामाजिक अभिसरण, आर्थिक नाती यातील वाढती गुंतागुंत आणि परंपरांचा अविचारी स्वीकार वा धिःकार यामुळे मनःस्वास्थ्य पार बिघडले आहे. यामुळे भ्रूणहत्या, बालहत्या, बालकांवरील अत्याचार, अल्पवयीन माता (पुष्कळ देशात लैंगिक शिक्षण शंभर टक्के लोकांना देऊनही असे गुन्हे वैवाहिक पीडा व घटस्फोट यांचं प्रमाण कमी झालेलं नाही.) वगैरे विकृती एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला हुंडाबळीसारख्या अपप्रवृत्ती बोकाळत आहेत. परंपरा वा संकेतांचं ठोकळेबाज पुनरुज्जीवन व धोपटमार्गी तथाकथीत क्रांतिकारक उच्चाटन याद्वारे जगाला सतावणाऱ्या ह्या कौटुंबिक समस्या सुटणार नाहीत.

याचा अर्थ भूतकाळातील परंपरा आणि संकेतांमधून शहाणपणा ग्रहण करुन घेऊन त्या शहाणपणाच्या आधारानं कौटुंबिक नाती व परस्पर कर्तव्याविषयीचे संकेत विकसित करायला/व्हायला हवीत. आजच्या परिस्थितीतील गुंतागुंत नीट लक्षात घेतली पाहिजे व तिच्या अनुरोधानं प्रगल्भ शहाणपणातून कौटुंबिक कायद्यांचा विकास व्हायला हवा. यावरुन लक्षात येईल की जुन ते सारं काही व जसच्या तसं ठेवण्याचा अट्टाहास वा जुनं ते सारं काही तोडून फोडून तथाकथित माणुसकीचे नवे मनमानी कायदे व नियम लादण्याचा हव्यास यातल्या कशाचाच, **संपूर्ण व मुळासकट कौटुंबिक समस्या सोडवण्यासाठी** उपयोग होणार नाही.

कुटुंब प्रणालीच्या निकोप विकासासाठी नामस्मरणच तारक ठरु शकतं. कारण नामस्मरण आमचे अंतःचक्षू उघडतं. आंतरिक एकात्मता दाखवतं. या तऱ्हेने **नामस्मरण नियम, कायदे, संकेत, परंपरा वगैरेंच्या मुळाशी असलेल्या आमच्या अपेक्षांच्या माणुसकीपूर्ण विकासाला** चालना देतं. या तऱ्हेने नामस्मरणानं परंपरा व संकेतांची आपल्या मनावरील अवाजवी व तर्कदुष्ट पकड ढिली होऊ लागते. **जाचक व परस्परपूरक अशा अपेक्षा आणि संकेतांच्या दलदलीतून नामस्मरण आम्हाला बाहेर काढू शकतं.** सोप्या भाषेत सांगायचं तर नामस्मरणानं आमचं लक्ष परस्परांमधील अजरामर अशा आंतरिक एकात्मतेवर स्थिरावतं. अनादी व अनंत अशा, परस्परांना जोडणाऱ्या नियंत्रित करणाऱ्या, संगीताशी, शक्तीशी व सत्याशी आमचं चित्त निगडित होतं. नामस्मरणानं येणाऱ्या ह्या चित्तवृत्तीतून सहिष्णुता येते व आमचे अंतरंग प्रगट करण्याची खंबीरता येते. आजच्या संदर्भात पाहायचं तर कुटुंबाच्या सदस्यांमधील एकात्मतेची जाणीव ओसरत चाललीय, हरवत चाललीय. यामुळे एका बाजूला स्वतःचे अवाजवी लाड करण्याची आणि दुसऱ्या बाजूला दुसऱ्याच्या मूलभूत गरजा डावलण्याची वृत्ती फोफावते आहे. ह्याचा परिणाम असा की भौतिक सुखाच्या हव्यासापोटी इतरांच्या जीवावर उठवण्याची विकृती बळावते आहे. प्रेमळ कुटुंबजीवनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या करण्याची ताकद ह्या विकृतीमध्ये कशी दडलेली आहे हे सहज लक्षात यायला हरकत नाही. कोणतेही धोपटमार्गी नियम, कायदे वा आचारसंहिता लादून उत्कट भावबंध सचेतन होऊ शकत नाही. हे भावबंध आनंदानं व स्वकर्तव्यानं रसरसलेल्या कुटुंबजीवनाचा प्राण असल्यामुळे धोपट मार्गी नियम व कायदे कुटुंबसंस्थेचं गतवैभव पुनर्स्थापित करु शकत नाहीत. नामस्मरणानं आंतरिक एकात्मता व जिव्हाळा ही आमच्या जीवनाचे केंद्र बनतात. आमचं जीवन ह्या केंद्राभोवती व ह्या केंद्राच्या जीवनरसावर पोसलं जाऊ लागलं व फुलू लागतं आणि त्यातून सुसंवादी व सुंदरतम असं कुटुंब जीवन मोहरतं, बहरतं.

२९. नामस्मरण आणि विचारसरणी

अस्तिक किंवा नास्तिक व धार्मिक किंवा निधर्मी विचारसरण्या म्हणजे विविध आकलन प्रक्रियांचे संच आहेत. ह्या संचांना दोन पैलू असतात. एक म्हणजे त्यामध्ये विश्र्वाविषयीचा दृष्टिकोन किंवा संकल्पना असते. दुसरा जो पैलू या दृष्टीतून जन्माला येतो, तो म्हणजे सर्वांची वागणूक घडवण्यासाठी समाजव्यवस्थेचा आराखडा, विविध सूचना, मते, कायदे, धर्माज्ञा इत्यादी तयार करणे

प्राचीन काळामध्ये जेव्हा विचारसरण्या नव्हत्या तेव्हा मूल प्रवृत्तीनुसार मानवी आचरण घडत असे. हे आचरण पशुंसारखं होतं. या वागण्याचं वैशिष्टय म्हणजे हेतु पुरस्सर कारस्थाने करुन ती अंमलात आणण्याचा अभाव. **मानवी उत्क्रांती दरम्यान स्वतः च्या वागणुकी बदलची व स्वतःच्या भावना, वासना, इच्छा, स्वप्नं, विचार याबद्दलची जाणीव जागृत होत गेली. मानवी मनाची संवेदना आणि मानवाची वागणूक ह्यांच्या रस्सीखेचीतून तसेच मनोव्यापारांची जाणीव, त्यांचा मनोविश्र्वावरील परिणाम व ह्या परिणामांचा वागणुकीवरील प्रभाव यांच्या परस्पर प्रक्रियेतून योग्य-अयोग्य, श्रेष्ठ -कनिष्ठ, चांगले -वाईट, नैतिक-अनैतिक, देव-राक्षस, न्याय-अन्याय, वगैरे शेकडो बाबींची उत्पत्ती होत गेली व त्यांच्यातून अध्यात्मिक व भौतिक विचारसरण्या उद्‌भवल्या व विकसित झाल्या असे दिसते.** यातून सामुहिक शक्ती उत्पन्न होऊन त्यातून महाकाय चळवळी व व्यापक कार्ये पार पडली, केवळ गरजेपोटी प्राचीन काळी केली जाणारी शिकार व आधुनिक काळामध्ये विशिष्ट सिद्धांतापोटी केली जाणारा वंशविच्छेद पाहिला तर वरील विधान स्पष्ट होईल. त्याचप्रमाणे प्राचीन काळातील नैसर्गिक बालसंगोपन आणि आजच्या काळातील बालसंगोपनाच्या अभ्यासवर्गांच्या, संबंधित लिखाणाच्या महापूरातील (गटांगळया खाणारे) बालसंगोपन पाहिले तरीही ‘विचारविकास’ व त्यातून होणारे ‘व्यापक सामाजिक परिवर्तन’ यांचा प्रत्यय येतो. एवढंच नव्हे तर इतिहास पूर्वकाळातील मुलभूत प्रवृत्तीतून उद्‌भवणारे स्वाभाविक लैंगिक जीवन आणि सिद्धांतांवर आधारलेलं आजच्या काळातील, तथाकथित स्वतंत्र, प्रगत व संपन्न समाजातील (सव्यंग, वाकडंतिकडं, विकृत) लैंगिक जीवन पाहिलं तरीही "विचारविकासाची... विचारसरण्यांच्या प्रगतीची" व त्यांच्याा व्यापक प्रभावाची कल्पना येते.

सकृद्दर्शनी कदाचित असं वाटेल की मला ‘विचारसरणीहीन’ अशी प्राण्यांची वागणूक ‘विचारसरणीयुक्त’ अशा मानवी वागणुकीपेक्षा श्रेयस्कर वाटते. पण तसं मुळीच नाही.

विचारसरणीच्या अतीत जाणं व तिच्यावर स्वार होणं हेच मला श्रेयस्कर वाटतं. म्हणजेच विचारसरण्यांचा जाचक प्रभाव नष्ट होणं पण त्यांची उपयुक्तता भक्कमपणे टिकणं, विकसित होणं महत्वाचं आहे. आवश्यक आहे. अजाण पशुची मूलप्रवृत्तीजन्य वागणूक आणि ''सिद्धांतात बांधलेली'' मानवी वागणुक ह्या दोन्हीहून अंतःप्रकाशात उजळलेलं आचरण श्रेष्ठ आहे. योगे त्यांची जोपासना व संवर्धन होणं आवश्यक आहे. पण विचारसरण्याची मानवावर हुकुमत न चालता त्यांनी प्रगल्भ मानवाची सेवा करायला हवी. अशा तऱ्हेनं विचार प्रणालींना मानवी समाजात व जीवनात महत्वाचं व योग्य स्थान हवचं. पण ते स्थान म्हणजे त्यांनी मानवी समाजावर अंमल न चालवता त्याला उपयोगी पडलं पाहिजे.

विचारसरण्यांच्या अतीत असं हे प्रकाशाचं विश्व खऱ्या अर्थानं लोकशाही आहे. नामस्मरणानं ते सर्वांना खुलं होऊ शकतं. या विश्वापासून आपल्यावर नियमांचे ढाचे लादले जात नाहीत. त्या ऐवजी आपणा सर्वांना या विश्वापासून चेतनेचा महास्त्रोत मिळतो. उदात्ततेची संजीवनी मिळते. नास्मरणानं विचारांच्या जाचक प्रभावापासून मुक्ती मिळते आणि जाचक विचार इतरांवर लादण्याच्या 'वेडातूनही' मुक्ती मिळते. याचवेळी नामस्मरणानं मूलभूत प्रवृत्ती, वासना व स्वार्थांध हव्यासातूनही मुक्ती मिळते ते वेगळं सांगायची गरज नसावी. नामस्मरणानं वैचारिक प्रचारांचे युद्ध भडकविणे वा अशा युद्धात होरपळणे ह्या दोन्हीपासून आपण परावृत्त होऊ शकतो. एवढच नव्हे तर नामस्मरणानं अशी शक्ती येते की आपण असल्या युद्धातील बळीचं संरक्षण करू शकतो व असले युद्ध भडकवणाऱ्या गुन्हेगारांना पराभूत करू शकतो.

विचारसरण्यांच्या प्रभावाने त्या त्या जातीच्या, राष्ट्राच्या, वंशाच्या, धर्माच्या, वर्गाच्या वा विचारसरणीच्या सदस्यांमध्ये ''प्रेम'' उत्पन्न होते. कधीकधी वैश्विकतेच्या घोषणामध्ये दडून ''गटबाजीचं प्रेम'' फोफावतं आणि परिणामी गटबाजींच्या युद्धांचे वणवे भडकतात.

नामस्मरणानं आपण 'गटबाज प्रेम' व 'गटबाज शत्रुत्वाच्या' पलिकडे असलेल्या खऱ्या वैश्विक एकात्मतेच्या व सुसंवादाच्या जगात प्रवेश करतो. ह्या जगातलं जगणं इतकं सहृदय असतं की दुसऱ्यांचे विचार व वागणूक यावर बदल लादण्याचा विचारही मनाला शिवत नाही. (ह्या ठिकाणी एक बाब नीट लक्षात घ्यायला हवी. ती म्हणजे या पुस्तकातून देखील मी नामस्मरणाचा विचार लादू इच्छित नाही. एवढेच नव्हे तर नामस्मरणाचा सल्लाही देत नाहीय. नामस्मरणाचे जे पैलू/परिणाम मला दिसतात तसे ते मी मांडीत आहे एवढेच, शिवाय वाचकांनी ह्या लिखाणावर 'विश्वास' ठेवू नये असं जे स्पष्टपणे लिहीलय ते अगदी प्रामाणिकपणे लिहीलेलं आहे.) नामस्मरणानं अगदी आपोआप आत्मप्रचीतीची प्रक्रिया सुरु होते आणि त्याद्वारे प्रगट होणारा आंतरिक आनंद व प्रकाश इतरांनाही ह्या महाप्रक्रिये सहभागी होण्यात सहाय्यभूत ठरतो.

३०. नामस्मरण आणि चमत्कार

बहुसंख्यांना जे जमत नाही व निसर्गाच्या ज्ञात नियमांनी ज्याचा खुलासा/स्पष्टीकरण होत नाही ते सारे आपण 'चमत्कार' या सदरात जमा करतो. देशोदशीच्या पुराणकथा, परीकथा वगैरेंतून चमत्कार व चमत्कारी शक्तींचे सुरस वर्णन आढळते. अध्यात्मिक संप्रद्रायांमध्ये देखील चमत्कार करणाऱ्या साधु-संतांची वर्णने आढळतात. याशिवाय निसर्गात घडणाऱ्या चमत्कारांविषयीही आपण वाचतोच.

चमत्कारांभोवती नेहमीच एक गूढ वलय असतं. चमत्कारांच्या कथांमुळे कधी कुतुहल जागृत होतं, तर कधी विस्मयानं आपण वेडावतो. कधी कधी तर आपल्याकडे चमत्कारी शक्ती, सिद्धी असाव्या असही वाटू लागतं. काहीवेळा चमत्कारांचा ध्यास लागल्यामुळे आपल्यामध्ये सिद्धी असल्याचा भ्रम देखील होऊ शकतो. काही बुवा-महाराज चमत्कारांचा लोकमानसावरील प्रभाव लक्षात घेऊन लोकांना सपशेल फसवतात. याउलट पुष्कळजण चमत्कारांविषयीच्या भीती व दहशतीपोटी तथाकथित चमत्कारी बाबांसमोर नतमस्तक होतात. अशा वेळी 'चमत्कार' हे केवळ मुलांच्या निर्भेळ मनोरंजनाचा विषय राहात नाहीत. ते मानवजातीचे अत्यंत दुष्ट शत्रू बनतात.

एक रुपयाची हाव शंभर रुपयांच्या हावेपासून वेगळी नसते. खुनांच्या संख्येनुसार खुनी वृत्तीमध्ये मूल्यात्मक फरक करता येत नाही. तसेच चमत्कारांचा हव्यास आणि भौतिक सुखसंपत्तीचा हव्यास ह्यांमधील क्षुद्रपणामध्ये तात्विक दृष्टया फरक नाही. त्याचप्रमाणे संपत्तीचा वा शक्तिचा माज हा चमत्कारांच्या माजापेक्षा भिन्न नसतो. कारण ह्या दोन्हींमध्ये अध्यात्मिक पोकळी व अडाणीपणा सारखाच असतो. तसेच इतरांवर आर्थिक, राजकीय व अन्य शक्तीद्वारे स्वतःचे आधिपत्य लादणे व चमत्कारांच्या जोरावर इतरांना स्वतःचे गुलाम बनवणे यात सारखाच अत्याचारीपणा आहे. याबरोबरच हेही लक्षात ठेवायला हवं की संपत्ती-वैभवासमोर गुडघे टेकणं आणि चमत्कारांपुढे लोटांगण घालणं ह्या दोन्हीमध्ये सारखाच मूर्खपणा, भाबडेपणा आणि भ्रमिष्टपणा आहे.

सर्व अव्वल दर्जाच्या अध्यात्मिक ग्रंथात चमत्कार व सिद्धीच्या हव्यासाविषयी नापसंती असते. सिद्धीचा वा चमत्कारांचा ध्यास आजकाल बैद्धिक, राजकीय, आर्थिक, शारीरिक वगैरे सर्व क्षेत्रात व रोजच्या जीवनात आढळतो. चमत्कारांची चट आणि भोगलालसेची बेसुमार वाढ ह्यामुळे परस्परपूरक आणि बेफाम व समाज घातकी अशा

शक्तीचा प्रलयंकारी गदारोळ सुरु झाला आहे.

नामस्मरणानं क्षुद्र हव्यासाची जळमटं नाहीशी होऊन मन निरपेक्ष बनतं. निस्वार्थ बनतं एखाद्यानं काही संकुचित हेतूनं जरी नामस्मरण सुरु केलं तरी कालांतरानं त्या मूळच्या क्षुद्र ध्येयाची ढापणे गळून पडतात. थोडक्यात असे की नामस्मरणानं सिद्धीच्या (चमत्कारांच्या) मोहजाळापासून संरक्षण मिळतं. ही बाब फार महत्वाची आहे. कारण चमत्कारच शोषणाची साधनं बनले वा पूजास्थानं बनले, वा ध्येय बनले तर ते इतर कोणत्याही हीन बाबीप्रमाणेच विनाशकारी ठरू शकतात. सिद्धी वा चमत्कार हे इतर कोणत्याही वस्तुप्रमाणे असून नामस्मरणाच्या आत्मज्ञानाच्या प्रकाशात ते गौण असतात तर नामस्मरण व आत्मज्ञानाच्या अभावी ते सर्वांचा ऱ्हास घडवून आणू शकतात.

३१. नामस्मरण आणि काव्य

काव्याची व्याख्या करण्याची इथे आवश्यकता नाही. कदाचित सर्वसंमत व्याख्या देणं शक्यही होणार नाही. परंतु आपण बहुतेक सारे विविध काव्य प्रकाराशी आणि त्यांच्यातील समान वैशिष्ट्याशी परिचित असायला हरकत नाही. सामान्यतः असं म्हणता येईल की काव्य म्हणजे प्रेम, आस्था, त्याग, आकर्षण, आक्रमकता, आनंद, निराशा, गुदमरणं, घुसमट, विजय, तिरस्कार, किळस, उपहास, अस्वस्थता, वैचित्य, तर्कदृष्टता, विस्मय, हास्य वगैरेंचा आविष्कार असतो.

लाखोंच्या अस्मितेला व आकांक्षांना शब्दात प्रगट करणारे व हजारो वर्षे टिकणारे काव्य म्हणजे मानवी समाजाचे सांस्कृतिक धन होय. ह्यांनाच आपण महाकाव्य म्हणतो. संकुचित विचार बाजूला ठेवले तर रामायण हे मानवी इतिहासातील एक सर्वश्रेष्ठ महाकाव्य आहे हे कुणालाही मान्य होईल. जगभरातील कोट्यावधी लोकांना हजारो वर्षांपासून रामायणाकडून प्रेरणाा मिळत आली आहे. **रामायणकार महर्षि व कविश्रेष्ठ वाल्मिकी नामस्मरण करीत होता ! काव्यप्रतिभेचा एक श्रेष्ठतम आविष्कार अशी ज्ञानेश्वरी ज्यांनी जगाला दिली ते ज्ञानेश्वर महाराज सतत नामस्मरण करीत.**

नामस्मरणानं संकुचित व वैयक्तिक आवडीनिवडीची पकड ढिली होते. साहजिकच कविचं लक्ष क्षणिक व वैयक्तिक सुखदुःखाच्या आवर्तातून, व तात्कालिक प्रतिक्रियातून आणि पूर्वग्रह मिश्रित भावनातून विश्वाच्या आर्ताकडे आकृष्ट होतं. वस्तुनिष्ठ आकलन व अनूभूतींमध्ये रंगू लागतं, काव्याचा आशय मग हळू हळू धार्मिक, प्रांतिक, राष्ट्रीय, भाषिक, वांशिक व असे इतर पडदे व अडथळे मोडून वैश्विक व अजरामर होऊ लागतो. नामस्मरणामुळे कवीची कविता संकुचितपणाची सारी बंधने तोडून वैश्विक बंधुभावाच्या चिदाकाशात झेप घेते. काव्यप्रतिभा आणि काव्य दोन्हीही मग विचारातीत, विज्ञानातीत, धर्मातीत व व्यक्तीत्वातीत अशा चिरकाल चैतन्यादायी व वैश्विक प्रेमामृत सागराचे समधुर प्रगटन बनतात. हे काव्य मग आपणा सर्वांना सुलभ व सहज प्राप्य असे सर्वंकष उत्थानाचे महामार्ग बनते.

३२. नामस्मरण आणि कर्मचारी

कर्मचारी आणि मालक यांच्या संबंधावर आतापर्यंत पुष्कळ काही लिहीलं गेलं आहे. आजच्या काळात कंपनी ते मिल, गाव ते शहर, सार्वजनिक ते खाजगी क्षेत्र, शेती मजूर ते खाण कामगार आणि कंत्राट कामगार ते कायमचे कामगार आणि त्या त्या प्रत्येकाचे मालक यांच्यातलं नातं बदलत जाताना आढळतं. म्हणजेच वर्ग वैशिष्टये फारच धूसर होत चालली आहेत.

कामगार वर्ग एकसंघ राहिलेला नाही, एक जिनसी राहिलेला नाही. त्यामुळे कामगारांच्या विभिन्न गटांचे हितसंबंध व प्राधान्य (निकड) बदलते. कारण काही धोरणांमुळे काही कामगार गटांचा फायदा तर काहीचं नुकसान होतं. विकसित व विकसनशील राष्ट्रातील कामगारांदरम्यान ही बाब प्रकर्षाने जाणवते. गरीब राष्ट्रांच्या कामगारांच्या जीवावर श्रीमंत राष्ट्रांचा कामगार पोसला व तुष्टविला जातो.

परंतु ह्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष किंवा डोळेझाक केली जाते, तिचा अभ्यास होत नाही. कामगारांची परिस्थिती काहीशी सुधारलेली असली तरी एकंदरीत पाहता न्याय्य समाजाच्या उभारणीत जागतिक कामगार चळवळच नव्हे तर आपल्यातील प्रत्येक व्यक्ती उणी पडत आहे. ही बाब लक्षात घ्यायला हवी. आपल्याप्रमाणेच कामगार संघटनांमध्ये ही आंतरिक प्रकाशाची शक्ती नसल्यामुळे योग्य दृष्टीकोन, धोरणे, योजना, डावपेच व 'संघर्षाचे' मुद्दे ठरवण्यासाठी अत्यावश्यक अशी एकात्मतेची जाणही त्यांना नाही. यामुळे जागतिक कामगार चळवळी पुष्कळ प्रमाणात पंगु झाल्या आहेत किंवा भरटकल्या जात आहेत.

या परिस्थितीच प्रमुख कारण म्हणजे आमच्याप्रमाणेच कामगार संघटनांनी त्यांच्या दृष्टीकोनांचा धोरणांचा व योजनांचा विकास वैश्विक कल्याणाच्या भूमिकेतून केलेला नाही. आपलं सर्वाचं कामगार संघटनांचं वेदान्ती तत्वज्ञानविषयीचं अज्ञान वा त्यांची या तत्वज्ञानाविषयीची अपुरी समज यामुळे हे घडलं असावं, एका बाजूला भोगवादी चंगळवादी संस्कृती दुसऱ्यांच्या रक्तावर फोफावते आहे आणि दुसरीकडे शोषणाचा असहाय्य स्वीकार होताना दिसतो आहे.

अध्यात्मिक व नैतिक विघटनाची प्रक्रिया अखंडपणे, अप्रतिहत चालूच आहे.

नामस्मरणानं येणाऱ्या वैश्विक दृष्टीतून या परिस्थितीवर तोडगा सापडू शकतो.

वर्गामध्ये विभागलेला समाज नामस्मरणाच्या प्रक्रियेतून खऱ्या अर्थानं एकजीव व वर्गातीत बनू शकतो. आंतरिक एकात्मतेच्या स्पष्ट जाणीवेतून बाह्य परिस्थितीतही एकात्मता (जी वर्गहीन समाजाच्या संकल्पनेत अंतर्भूत आहे) येऊ शकते हे कळलं तर नामस्मरणाचं महत्व पटू शकतं. परंतु केवळ एक वर्ग नष्ट करण्याच्या (दुसऱ्या वर्गाच्या) धडपडीनं कुणाही वर्गाचं हित संभवत नाही.

कामगार नेता असो वा सफाई कामगार, नामस्मरणानं त्यांच्या त्यांच्या क्षेत्रामध्ये विकासाचे नवे मार्ग त्यांना सुचू लागतात, जे अचूक धोरणं व कृतीसाठी अत्यावश्यक असतात. कामगार नेतृत्वाची संधिसाधु व स्वार्थी वृत्ती वा त्यांचा भौतिक सुखवादाचा निकष यावर आणि भूमिहीन शेजमजूर व बालकामगारांची असहाय्यता यावर नामस्मरणाच्या संजीवनीने मात करता येईल. या संदर्भात नामस्मरणाची तुलना वीजेशी करता येईल, जी राजमहाल, बंगला व झोपडी सर्वत्र प्रकाश देते व अत्यावश्यक असते.

कामगार वर्गाच्या हितासाठी धडपडणाऱ्यांसाठी नामस्मरणानं येणारी सांस्कृतिक प्रगल्भता हे सहज वापरता येण्यासारख एक प्रभावी हत्यार आहे. याचं प्रमुख कारण असं की नामस्मरणानं जीवनाला असे स्थान/स्थिती प्राप्त होते की जी बौद्धिक , तंत्रज्ञानजन्य, आर्थिक, सैनिकी वा अन्य कोणत्याही प्रकारे पराभूत केली जाऊ शकत नाही. ह्याचा प्रत्यय इतर कोणत्याही प्रकारे पराभूत केली जाऊ शकत नाही. ह्याचा प्रत्यय इतर कोणत्याही प्रकारे नव्हे तर नामस्मरणानेच येतो. अर्थात बुद्धीनं आपल्याला याबद्दल तर्कशुद्ध कल्पना करता येते. नामस्मरणानं आपण अधिक अवैयक्तिक कसे होतो, बहुसंख्यांच्या हिताचे कसे होऊ शकतो व त्यातून स्वतःच्या व समाजाच्या सर्वंकष हित साधण्याचे सामर्थ्य कसे येते व वाढत जाते याचे चित्र नीट विचार केला तर विचारचक्षुनी आपल्याला पाहता येते पण अनुभवता येत नाही. पोहण्याच्या कल्पनेत व अनुभवात जसा फरक आहे तसाच फरक नामस्मरणाचे वैचारिक आकलन आणि त्याच्या अनुभूतीमध्ये आहे.

नामस्मरण ही केवळ वैयक्तिक मुक्तीची प्रक्रिया नाही. वैश्विक अध्यात्मिक पुनरुत्थानाची, चैतन्यदायी संजीवनाची व भौतिक सुबत्तेची ती प्रक्रिया आहे.

३३. नामस्मरण आणि अहिंसा

स्वतःच्या, इतरांच्या मुक्तीसाठी, उत्थानासाठी जगणे म्हणजेच अहिंसा होय. जगाच्या कल्याणाची आस्था असलेल्या निस्वार्थी जीवनातून विचार, भावना व कृती प्रगट होण्याची प्रक्रिया म्हणजे अहिंसा. किंवा पूर्णपणे अवैयक्तिक (वैश्विक) मनोभूमिकेतून उद्‌भवणारे विचार, भावना व कृती म्हणजेच अहिंसा असेही म्हणता येईल.

काहींच्या मते अहिंसा म्हणजे दुसऱ्या व्यक्ती वा जीवांना क्लेश होतील असे विचार व कृती न करणे. खोलवर जाऊन अहिंसेच्या ह्या अर्थाचा विचार केला तर अशी अहिंसा अशक्य असल्याचं लगेच लक्षात येईल.

सरधोपटपणे, अहिंसा म्हणजे प्राण्यांना न मारणे, युद्धात भाग न घेणे असा जो प्रचार कोणताही संदर्भ लक्षात न घेता केला जातो तो अवास्तव, मानभावी, अवैज्ञानिक, तर्कदुष्ट व कधी कधी दुष्ट हेतूनं भरलेला असतो. असल्या अहिंसेचा पगडा एखाद्याचं जीवन मानसिक दृष्टया दुबळे व असहाय बनवू शकतो.

कुणाही जीवाला न मारणे हे केवळ अशक्यच नाही तर विज्ञानविरोधी आहे. अनैसर्गिक आहे. संकल्पनेच्या दृष्टीने पाहता ही गफलत आहे. कल्पना म्हणून पाहता ती आत्मवंचक, बनावट आहे. कारण ह्या संकल्पनेत मृत्यू हा वाईट आहे, खळ आहे व तो टाळला पाहिजे असा भ्रामक विचार आहे. वास्तविक पाहता जन्म आणि मृत्यू हे वैश्विक घडामोडीचे अविभाज्य घटक आहेत. त्यामुळे क्षुद्र लाभासाठी कुणाही जीवाला त्रास देणे वा मारणे हे जसे क्रूर आणि अज्ञानांधकाराचे लक्षण आहे, तद्वतच वैयक्तिक हळवेपणापोटी सर्व प्रकारच्या हिंसेपासून / हत्येपासून पळ काढण्याचा असफल प्रयत्न करणे हे देखील अडाणीपणाचे बावळटपणाचे आणि भेदरटपणाचे लक्षण आहे.

अहिंसा म्हणजे आकलन, विचार व कृतीमध्ये अधिकाधिक निस्पृह, अवैयक्तिक (विशाल) होणे. नेमकी हीच बाब नामस्मरणानं साध्य हाते. आत्मज्ञानाची इतर साधने वा मार्गाना खालच्या दर्जाचे लेखण्याचा इथे हेतू नाही. परंतु एवढच दाखवायचं आहे की इतर मार्गानी वैयक्तिकतेचा अंश तरी शिल्लक राहतोच. वेगळ्या प्रकारे सांगायचं झालं तर असं म्हणता येईल की एखाद्यानं, हत्या करण्याची व क्लेश देण्याची प्रवृत्ती, लैंगिक इच्छा, भावनात्मक आसक्ती, वस्तूंचा हव्यास वगैरे बाबींवर विजय मिळविला तरी त्याच्या जीवनात एखादा तरी वैयक्तिक स्वरुपाचा छांदिष्टपणाचा अंश राहतो आणि कालांतरानं

तो महाभंयकर स्वरुप धारण करु शकतो. याचं कारण असं की ह्या अशा वैयक्तिक अंशापोटी तो माणूस त्याच्या मनाप्रमाणे जगासाठी काही ‘विशिष्ट योजना’ बनवतो व इतरांवर त्या लादू पाहतो. हे टाळण्यासाठी आणि वैश्विक संकल्प स्वतःच्या निस्वार्थ स्थिती, दृष्टी आणि कृतीतून व्यक्त होण्यासाठी नामस्मरण अत्यावश्यक व अत्यंत उपयुक्त आहे. **नामस्मरणात समरसलेल्या** व्यक्तीची कृती निस्वार्थी, अवैयक्तिक आणि वैश्विक प्रगल्भतेने भरलेली असते यात शंका नाही.

३४. नामस्मरण आणि श्रद्धा

आमच्या जीवनातील बहुतेक कृती कळत नकळत श्रद्धेवर / श्रद्धेभोवती आधारलेल्या व साकारलेल्या असतात. पहा, आपले पालक, मुलं, नातेवाईक, परिचित, अध्यापक, डॉक्टर वगैरे साऱ्यांबद्दल आपल्या मनात कळत-नकळत तयार झालेली श्रद्धा असतेचं. करोडो डॉलर्सचे वा रुपयांचे व्यवहार विश्र्वासावर (श्रद्धेवर) चालतात. एवढच कशाला आपले पाळीव प्राणीही आपल्यावर श्रद्धा (विश्र्वास) ठेवतात व आपणही त्यांच्यावर अशी श्रद्धा ठेवतो !

परंतु विश्लेषक बुद्धीची प्रगती, बौद्धिक पुरावा पाहण्याचा ध्यास, कोणतीही बाब, बुद्धीने आकलन करुन घेण्याचा आग्रह, वास्तवाविषयीच्या माहितीचे डोंगर हे सारे एक बाजूला मानवाला उपयुक्त ठरले असले तरी त्यामुळे परस्पर विश्र्वासाला तडे जात आहेत. चिकित्सक बुद्धीने विश्र्वातील वास्तव व त्यामागील यंत्रणेचा अभ्यास करताना मानव विश्र्वाच्या आंतरिक एकात्मतेबद्दलच संशयखोर व नास्तिक्यवादी झाली आहे. कालचक्राची गती अर्थातच उलटवता येत नाही. असं करण्याचे प्रयत्न विफळ होणं किंवा घातक ठरणं साहजिक आहे. **आंतरिक एकात्मतेची प्रचीती येण्यासाठी मर्यादित बुद्धीतून उत्पन्न झालेले संशय व तथाकथित नास्तिक्यवाद जिंकण्याची गरज आहे.** नामस्मरणानं ते शक्य होऊन एकात्मचेची विहंगम अशी प्रचीती येते.

या ठिकाणी श्रद्धेचा नेमका व तात्विक अर्थ समजावून घेणं आवश्यक आहे. अध्यात्मिक, पारंपारिक दृष्टया श्रद्धा म्हणजे अहंकाराची ईश्र्वर वा गुरुपुढील शरणागती.आज बौद्धिक प्रक्रियांची गुंतागुंत व कंगोरे एवढे वाढले आहेत की स्वतःच्या संकुचित 'स्व'ची खरी शरणागती/समरसता **नामस्मरणातच व नामस्मरणानच** होऊ शकते. हे असं असण्याचं कारण म्हणजे नामाला शरण न जाणारा माणूस स्वतःच्या व इतर कुणाच्या तरी प्रभावामध्ये वा विचारांमध्ये गुरफटून जाऊ शकतो.

श्रद्धेच्या संदर्भात भूतकाळात पाहिलं तर मानवी विकासाचे काही टप्पे आढळतात. पहिला टप्पा असा की माणसाचे विचार व कृती त्याच्या संकुचित 'स्व' भोवती संघटित होतात आणि खऱ्या 'स्व' विषयीच्या संपूर्ण अज्ञानात चालू राहतात. पुढचा टप्पा असा की इतरांच्या विषयीचे प्रेम व करुणेच्या रुपात स्वतःच्या खऱ्या 'स्व' ची जाणीव होते व व्यक्ती अधिक न्याय्य (चांगल्या) जगासाठी धडपडू लागते. काही ठिकाणी ह्या टप्प्यावर नामस्मरण चालतं. सर्वत्र नाही. समाजवादी वा साम्यवादी विचारवंताचे

क्रांतिकारकांचे कार्य ह्या टप्प्यावरचे असते. पुढच्या टप्प्यावर 'स्व' चे खरे रुप म्हणजे नाम असल्याचा व त्याला कोणत्याही परिस्थितीत चिकटून राहण्याला सर्वाधिक महत्व येतं साऱ्या कृती ह्या अवस्थेतून आकाराला येतात व विकसित होतात, काळांतरानं वैश्विक आंतरिक एकांत्मतेशी व्यक्ती तद्रूप/समरस होते आणि वैयक्तिक (संकुचित स्वार्थी) विचार, योजना व आसक्ती नाहीशा होत जातात. यावेळी जाणवतं की शरीराचे नियंत्रक चेतनाकेंद्र जीवन आहे व जीवनाचे नियंत्रक केंद्र आहे जाणीव आणि ह्या जाणीवेचाही नियंत्रक, प्राण आहे वैश्विक चैतन्य. यावेळी जाणवतं की जो प्रेमामृत सागरात बुडून संकुचित स्वार्थी अस्तित्वाने मरतो तो तात्काळ अजरामर चैतन्यानं कालातीत जीवनाचा स्वामी बनतो.

नामस्मरणाच्या प्रक्रियेमधून आपण क्षणभंगूर, विभिन्नतेच्या व तुटकपणाच्या भक्कम भ्रमातून काळातील, व विश्व नियंत्रक एकात्मतेच्या प्रचीतीप्रत ये़तो. आजच्या काळात तथाकथित श्रद्धेमुळे लबाडी व शोषण करणाऱ्यांच फावू शकतं. कारण असल्या श्रद्धेमुळे आपणाकडून स्वतःची बुद्धी गहाण टाकली जाऊन मर्यादित बुद्धीच्या मदांध शोषणकर्त्यापुढे खुळचट / भोळसट शरणागती पत्करली जाण्याची शक्यता असते. परंतु याउलट अशा श्रद्धेचा अभावी स्वतःच्या मर्यादित आणि वैयक्तिक (व म्हणूनच चुकू शकणाऱ्या) बुद्धीवर विसंबण्याची शक्यता असते. त्यामुळे संशय व बेदिलीचं दुष्टचक्र चालू होऊ शकतं.

ह्या परिस्थितीत नामस्मरण आपल्याला व वेदनेनं शीणलेल्या विश्वाला तारु शकतं.

नामस्मरण म्हणजे विचारशक्ती, इच्छाशक्ती व क्रियाशक्तीला सच्चिदानंदमय ज्ञानाचे परिमाण देण्याची महाप्रक्रिया होय. जीवनापासून तुटलेल्या व पुष्कळदा जीवनविरोधी बनलेल्या तत्वज्ञान, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कौशल्य, काव्य, कला यांना जीवनात समरसून घेण्याचा व वैयक्तिक आणि सामाजिक जीवनामध्ये व रोजच्या व्यवहारात आणण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे नामस्मरण आहे. ही बाब सोप्या भाषेत स्पष्ट करणारे ''नामस्मरण - सर्वंकष वैयक्तिक व सामाजिक कल्याणाचा राजमार्ग'' हे पहिलेच पुस्तक असावे.

डॉ. श्रीनिवास ज. कशाळीकर यांच्या ह्या पुस्तकात नामस्मरणाने केवळ, अध्यात्मिक व मानसिक आणि प्रगती ईश्वराची प्राप्तीच नव्हे तर व्यक्ती व समाजाची ऐहिक प्रगतीही कशी होते याचे स्पष्टीकरण आहे. अशा तऱ्हेच्या सर्वंकष कल्याणालाच या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीमध्ये डॉ. श्रीनिवास कशाळीकर सुपरलिव्हिंग म्हणतात. नामस्मरण हे वैश्विक एकात्मतेचे सूत्र असून धर्म, विचारसरण्या, वंश, राष्ट्रीयत्व इत्यादींच्या ते अतीत असल्याचेही ह्या पुस्तकामध्ये दाखवून देण्यात आले आहे.

पुस्तकातील आशयावर विश्वास न ठेवता स्वतःचा अभ्यास, विचार व प्रत्यक्ष अनुभव यावर हा आशय पडताळून पाहणे वाचकांना हितकर ठरेल.

